
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक ११ / नोव्हेंबर २०१८

## संपादकीय

### सामर्थ्य व्यवस्थेचे

मानवाच्या इतिहासाचा अभ्यास म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या 'व्यवस्थां'चा (Systems) अभ्यास. जन्मापासून मृत्यूपर्यंत तो त्यांनीच निर्माण केलेल्या व्यवस्थांमध्ये जगण्याकरता धडपडत असतो. मानवाच्या सर्जनाची सर्वात मोठी कलाकृती म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्था. या व्यवस्थेचा प्रभाव जेव्हा कमी होतो, किंवा त्या जेव्हा कोलमडतात तेव्हा ती संस्कृती लयाला गेलेली असते.

नुकताच कल्याणचा पत्रीपूल इतिहासजमा झाल्याची बातमी सर्वच वृत्तपत्रांनी दिली आहे. (महाराष्ट्र टाईम्स, सोमवार १९ नोव्हेंबर पृष्ठ १). यातली सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे नियोजित वेळेआधी एक तास हे अवाढव्य काम पूर्ण करण्यात रेल्वे यंत्रणा यशस्वी झाली होती. आपला सर्वसाधारण अनुभव लक्षात घेता अशा गोष्टी फार क्वचित घडतात. याचं प्रमुख कारण म्हणजे या गोष्टींच्या नियोजनापासून, त्यातील सर्व घटकांमध्ये सुसुत्रता आणणे इत्यादी गोष्टी कुठेतरी ढेपाळतात. कुठलातरी घटक आपलं विहित काम अपेक्षेप्रमाणे करत नाही, किंवा हे नियोजन करणाऱ्या व्यवस्थापकांना कामाच्या आवाक्याची पुरेशी कल्पना आलेली नसते.

थोडक्यात, अशा कामांच्या यशस्वीतेकरता, त्याची 'व्यवस्था' म्हणजे सर्व घटकांमध्ये सुसुत्रता आणण्याची क्षमता आणि दृष्टी त्या नियोजकांमध्ये लागते. मुंबई विद्यापीठाचा सध्याचा परीक्षांचा गोंधळ काय, किंवा आपल्या रस्त्यावरील वाहनांची अंदाधुंद वर्दळ काय, या सगळ्या घटना ह्या अ-'व्यवस्थेची' उदाहरणे आहेत. सुभाषितकाराने म्हणूनच म्हणून ठेवले आहे की, 'अव्यवस्थित चित्तानां प्रसादोऽपि भयंकरः।'.

जे व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे तेच समाजाच्या बाबतीतही लागू होतं.

मानववंशशास्त्रीय किंवा शरीररचनाशास्त्राप्रमाणे सगळ्या प्राणीमात्रांची उत्क्रांतीच मुळी एका पेशीपासून वाढत बहुपेशीय प्राण्यांमध्ये झाली. त्यांची अवयवांची उत्क्रांती देखील गरजांप्रमाणे होऊ लागली. तसेच गरज नसलेले अवयव गळूनही पडायला लागले. पण मानवाचा विकास म्हणजे केवळ शरीर शास्त्रीय रचनांमधील उत्क्रांती नाही, तर त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थांचा विकासही तेवढाच महत्त्वाचा आहे.

मानव जसा समूह करून राहू लागला तसा तो परस्परावलंबी होऊ लागला. व्यष्टी आणि समष्टी या सगळ्यांचाच विचार त्याला करणे अपरिहार्य झाले. त्याच्या आवडीनिवडी, स्वतःचे व समुहाचे संरक्षण, या सगळ्यांमधूनच त्याच्या

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

संस्कृतीचा विकास व्हायला लागला, आणि 'समाजव्यवस्था' या निर्माण व्हायला लागल्या.

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा. त्यांची निर्मिती, आणि उपयुक्तता या सगळ्यांमध्ये एक 'व्यवस्था' निर्माण व्हायला लागली. वस्तुंचा वापर, विनिमय, उपयुक्तता यांच्या सुलभ वापराकरता व्यापार, चलन व दळणवळणाकरता ही व्यवस्था निर्माण झाल्या.

भारत हा एक प्राचीन देश आहे. त्याचे साहित्य, स्थापत्य, कला यांच्या निर्मिती आणि वहना करता ही अशा व्यवस्था निर्माण झाल्या. इतर प्राणी आणि मुनष्य यातला सर्वात महत्त्वाचा फरक म्हणजे त्याची भाषेची क्षमता. पुढे ज्यावेळी लेखनकला उदयास आली तेव्हा या व्यवस्थेचे 'संहिती'करण व्हायला लागले. आपण भारतामध्ये तर धर्म, अर्थ, काम आणि मोक्षादी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या व्यवस्था व त्यांचे संहितीकरण केले आहे. ऐहीक आणि पारमार्थिक जीवन सुसह्य आणि सुखकारक करण्या करता भारतीय संस्कृतीने लग्न, कुटुंब, संस्कार इ. वैशिष्ट्यपूर्ण व्यवस्था निर्माण केल्या.

यातली सर्वात महत्त्वाची 'व्यवस्था' म्हणजे 'वर्णाश्रम' व्यवस्था.

भारताप्रमाणेच ग्रीक आणि रोमन संस्कृत्या देखील होत्या. त्यांच्याही 'व्यवस्था' होत्या. आजचा पाश्चात्य समाज आपल्या संस्कृतीची मूळं या ग्रीक आणि रोमन संस्कृती, अर्थात 'व्यवस्थां' मध्ये शोधतो. रोमन साम्राज्य इसवीसनाच्या ५ व्या शतकात लयाला गेले. तेव्हापासून, ते १५ व्या शतकापर्यंतचा (मध्ययुगीन) काळ हा पाश्चात्य संस्कृतीचे 'अंधारयुग' होते. याचे मूळ कारण त्यांच्या व्यवस्थेचे स्रोत नष्ट झाले होते व नवीन व्यवस्था आणण्याची व टिकवण्याची क्षमता त्यांच्यात नव्हती. 'प्रबोधन' युगाचे प्रयोजनच मुळी आपल्या मूळ व्यवस्था, म्हणजे ग्रीक किंवा रोमन व्यवस्थेकडे जाण्याचे होते. ख्रिस्ती धर्मामध्ये आलेल्या भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य मुनष्य नाडला होता. प्रबोधन युगातूनच पुढे विज्ञानयुग व यंत्रयुग सुरू झाले. याचा परिणाम त्यांच्या संपूर्ण जीवनशैलीवर झाला आणि यातूनच आधुनिक पाश्चात्य जीवनशैलीची नवीन व्यवस्था निर्माण झाली.

मध्ययुगीन काळ हा भारताचे अंधकार युग नव्हते. ५ व्या ६व्या शतकात भारतात कालिदास, आर्यभट निर्माण झाले. भारतातल्या 'अव्यवस्थेला' सुरुवात ८-९ व्या शतकातील सिंध मधील इस्लामी आक्रमणांनी झाली. १२ व्या शतकात ही आक्रमणं दिल्लीपर्यंत येऊन पोहोचली व पुढचा मुघल इतिहास आपल्याला परिचित आहेच.

या सात-आठशे वर्षांच्या आक्रमणाच्या इतिहासामध्ये भारतीय 'समाजव्यवस्था' संपूर्णपणे विस्कळीत झाली. अशी अंदाधुंद आक्रमणे व बलात्कारांच्या पार्श्वभूमीवर नवीन विचार तर सोडूनच द्या, पण स्थिरावलेल्या व्यवस्थेलाही टिकवणे कठीण होऊन बसले. भारतातल्या समाज व्यवस्थांची नाळ ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडली गेली होती. इस्लामी आक्रमक व नंतरच्या वसाहतवाद्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था आणि त्यांचे एकमेकांवरील परस्परावलंबित्व जवळजवळ नष्ट केले. पाश्चिमात्य संस्कृती, आणि नवविज्ञानाला सुलभ अशा व्यवस्था निर्माण व्हायला लागल्या.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (१७०७) मुघल सत्ताही संपली होती. तत्कालीन सरदारांनी आपापल्या भौगोलिक क्षेत्रामध्ये स्वतःच्या स्वायत्त 'व्यवस्था' निर्माण केल्या. अर्थात त्या व्यवस्थाही व्यापक 'अ'व्यवस्थेचाच भाग होत्या.

१६०० मध्ये राणीचा जाहीरनामा घेऊन इस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी भारतात आले. अर्थातच ते व्यापार करण्याकरता आले होते, राज्य करण्याकरता नव्हे. सुरत, कलकत्ता, मद्रास, मुंबई इथे त्यांच्या

(पृष्ठ क्र.३९ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष एकोणिसावे/अंक ११/नोव्हेंबर २०१८

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ५ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | आऊरो प्रेटो: एक सुवर्ण नगरी | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | मूल्यवेध-०९: दखल | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | ओळख वनस्पतींची - धामण | श्री. प्रकाश दुधाळकर | ९ |
| ५) | 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ११ |
| ६) | दिवाळी दिव्यांचा उत्सव | डॉ. शैलजा धर्माधिकारी | १९ |
| ७) | आपला भाषिक लोच्या | अपर्णा कुलकर्णी | २१ |
| ८) | संकेत देशपांडे - व्ही.पी.एम्च्या माळेतील निखळलेला मोती | प्रा. सौ. व्ही. ए. जोशी | २३ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# आऊरो प्रेटो: एक सुवर्ण नगरी

*ब्राझील देशाच्या मध्य भागात आऊरो प्रेटो नावाचे एक सुंदर शहर आहे. शहराभोवती अनेक सोन्याच्या खाणी असल्याने या शहराची भरभराट झाली. आता या संपूर्ण नगराला 'युनेस्को हेरिटेज साईट' असा दर्जा दिलेला आहे. या गावाला प्रत्यक्ष भेट देऊन हा लेख लिहिलेला आहे. - संपादक*

तेहतिसाव्या मोस्ट्राटेक (Mostratec) स्पर्धेत सहभागी होण्याच्या निमित्ताने आक्टोबर महिन्यात ब्राझीलला जाण्याची संधी मिळाली. ही स्पर्धा नोव्हो हम्बुर्गो नावाच्या गावात होती. स्पर्धा संपल्यानंतर मी माझ्या काही प्राध्यापक मित्रांना भेटण्यासाठी आऊरो प्रेटो (Ouro Preto) या शहरात जाऊन आलो. त्यासाठी प्रथम मला बेलो हॉरिझांटो (Belo Horizonte) नावाच्या गावी विमानाने जायला लागले. तेथून पुढे १५० किलोमीटरवर आऊरो प्रेटो हे गाव आहे. हा प्रवास मी टॅक्सीने केला. संपूर्ण प्रवास जंगलातून करावा लागला. कोठेही सपाट जमीन नाही की शेती व्यवसाय नाही. रस्त्याला अनेक वळणे आहेत. रस्ता मात्र रुंद आणि चांगल्या स्थितीत आहे. त्यामुळे प्रवास सुखकर होतो. दोन तासांचा प्रवास करून मी इच्छित स्थळी पोहोचलो. तिथे पोहोचल्यावर असे लक्षात आले की, आऊरो प्रेटो हे सर्व बाजूंनी डोंगरानी वेढलेले हे एक सुंदर शहर आहे. तिथे काही दिवस राहिल्यानंतर या शहराबद्दल खूपच मनोरंजक माहिती मिळाली. दिशा मासिकाच्या वाचकांसाठी ती सगळी माहिती या लेखात देत आहे.



**जंगलातून जाणारी सुंदर वाट**

या गावाला आऊरो प्रेटो असे नाव पडण्याचे कारण की, या गावाभोवती सोन्याच्या अनेक खाणी होत्या. लॅटिन भाषेत सोन्याला ऑरम (Aurum) असे म्हणतात. प्रेटो (Preto) या शब्दाचा अर्थ 'काळा' असा आहे. येथे सापडणाऱ्या सोन्यावर काळसर थर आढळत असे. म्हणून या गावाचे नाव 'आऊरो प्रेटो' म्हणजे 'काळे सोने' असे पडले. आता येथील खाणीतून सोने काढणे परवडत नाही. त्यामुळे त्या बंद करण्यात आल्या आहेत. आता येथील खाणीतून लोखंड आणि ॲल्युमिनिअम यांची खनिजे मिळविली जातात. माझ्या मित्राने सांगितले की, या खनिजावर प्रक्रीया करण्याचे काम भारतातील हिंदाल्को (Hindalco) कंपनी येथे अनेक वर्षे करत होती. आता मात्र या कंपनीने आपले काम बंद केले आहे. लक्ष्मीकांत मित्तल यांची आर्सेलर ही कंपनी अजूनही येथे लोह खनिजावर प्रक्रिया करण्याचे काम करीत आहे. आजच्या घडीला हे शहर एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे.



**शहराचे एक मनोहारी दृश्य**

ब्राझील देशावर अनेक वर्षे पोर्तुगीजांनी राज्य केले. या भागात सोन्याचा साठा आहे हे कळल्यावर त्याचा उपयोग करून घ्यायचे त्यांनी ठरविले. खाणकाम

हे कष्टाचे काम आहे. त्यासाठी त्यांनी आफ्रिका खंडातून गुलाम आणले. खनिजावर प्रक्रिया करून मिळविलेले सोने ते पोर्तुगालला पाठवित असत. गुलामांना काही द्यायचे नाही, इथल्या मूळ लोकांना काही द्यायचे नाही, सगळे सोने आपल्या देशात न्यायचे अशी लूट त्यांनी अनेक वर्षे केली. या कामात हजारो गुलामांचा मृत्यू झाला. पण पोर्तुगीजांना त्याची काही पर्वा नव्हती. त्यानी आपल्या देशाला तर श्रीमंत केलेच त्याचबरोबर स्वतःसाठी शहरात चांगल्या इमारती बांधून घेतल्या.



**अधिकाऱ्याचे निवासस्थान**

सोन्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असल्याने राज्यकर्त्यांनी येथे दोन शिक्षण संस्था काढल्या. त्यातील एक खाणकामाशी संबंधित स्कूल ऑफ माईन्स (School of Mines) आणि दुसरी औषधाशी संबंधित स्कूल ऑफ फार्मसी (School of Pharmacy) होती. सोन्याच्या व्यवसायामुळे गावाची वेगाने भरभराट झाली. परंतु जेव्हा सोन्याच्या खाणी ओस पडायला लागल्या तेंव्हा मात्र लोक गाव सोडून जायला लागले. त्यामुळे गावाला अवकळा येऊ लागली. अशावेळेस या गावातील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांना बळ आले ते युनेस्कोच्या निर्णयाने. युनेस्कोने या संपूर्ण गावाला 'जागतिक वारसा असलेले स्थान' (UNESCO World Heritage Site) असा दर्जा दिला. त्यामुळे गावाला परत उभारी आली. परंतु गावाचे मूळ रूप तसेच ठेवले पाहिजे अशी युनेस्कोची अट आहे. जुन्या काळी दगडांचे रस्ते केले होते. ते तसेच ठेवावे लागतात. गावातील घरे पोर्तुगीजांनी त्यांच्या पद्धतीने बांधली होती. ते रूप देखील कायम ठेवणे आवश्यक आहे. गावातल्या वेशीबाहेर मात्र या अटी लागू होत नाहीत. तेथे आपल्याला हवे तसे बांधकाम करता येते.



**दगडाचे रस्ते**

या नगराचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेली संग्रहालये. शहर आणि आजूबाजूच्या परिसरात डझनाहून जास्त संग्रहालये आहेत. मला उपलब्ध असलेल्या वेळेत मी त्यातील तीन संग्रहालयांना भेट देऊन आलो. त्यापैकी पाहिले होते कॅसा डा मोडिया दो ब्राझील (Casa da Modia do Brasil). जुन्या काळी पोर्तुगीजांनी बांधलेल्या इमारतीत हे संग्रहालय आहे. या इमारतीत वरच्या मजल्यावर पोर्तुगीज अधिकारी आणि तळघरात त्यांचे गुलाम राहात असत. देश स्वतंत्र करण्यासाठी स्थानिक लोकांनी जेव्हा लढा सुरू केला तेव्हा त्यांना बंदिस्त करून ठेवण्यासाठी काही काळ या इमारतीचा तुरुंग म्हणून उपयोग होऊ लागला होता. ब्राझील सरकारने आता या इमारतीत एक माहितीपूर्ण संग्रहालय तयार केले आहे. या शहराचा सुवर्ण युग तेथे चितारला आहे. सोन्याच्या खाणी, त्यातून खनिजे मिळविणे, त्यावर प्रक्रिया करणे या सगळ्या बाबींची इत्यंभूत माहिती दिलेली आहे. अनेक प्रकारच्या सुवर्ण मुद्रा तेथे ठेवलेल्या आहेत. त्याचबरोबर गुलामावर राज्यकर्ते कसा अन्याय करीत असत याचे देखील चित्रण केले आहे. गुलामांना शिक्षा देण्यासाठी वापरली जाणारी हत्यारे पाहून आपले मन हेलावून जाते.



सुवर्ण मुद्रा

पोर्तुगीजांची गुलामी राजवट संपविण्यासाठी स्थानिक लोकांना अनेक वर्षे लढा द्यावा लागला. या लढ्याची माहिती देणारे एक संग्रहालय या शहरात आहे. त्याला म्युझिया डा इनकॉन्फिडेशिया (Musea de Inconfidencia) म्हणजे 'अविश्वास संग्रहालय' असे समर्पक नाव दिलेले आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एका प्रशस्त आणि सुंदर इमारतीत हे संग्रहालय आहे. स्वातंत्र्य लढ्याची कहाणी इथे उत्तम रीतीने चितारली आहे. त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे हे की, ज्या स्वातंत्र्य सैनिकांना पोर्तुगीजांनी फासावर लटकविले त्यांच्या अस्थी पुरून त्यांची थडगी येथे उभारली आहेत. या संग्रहालयाला भेट देऊन ब्राझीलच्या स्वातंत्र्य लढ्याची माहिती मिळविता येते.



संग्रहालयाची सुबक इमारत

मी तिसरे संग्रहालय पाहिले ते सेंट फ्रान्सिस डिसोझा ड आसिसी (Saint Francisi da Disouza da Asissi) या चर्चमध्ये आहे. त्याचे नाव 'ॲलिजाडिन्हो संग्रहालय' असे आहे. ॲन्टॉनिओ फ्रांसिस्को लिस्बोआ अलेजाडिन्हो (Antonio Francisco Lisboa- Aleijadinnho) हा माणूस आर्किटेक्ट होता. या चर्चची रूपरेषा त्यानेच आखली होती. याखेरीज अनेक कलाकुसरीच्या वस्तू त्यांनी बनविल्या. त्या वस्तूंचे प्रदर्शन येथे पाहायला मिळते. याखेरीज त्यांनी काढलेली सुंदर चित्रे देखील आपल्याला या संग्रहालयात पाहायला मिळतात.



कलेच्या वस्तू

गावाची लोकसंख्या सुमारे सत्तर हजार आहे. तरीही गावात अनेक चर्च आहेत. धनिक मंडळींनी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी काही चर्च बांधले. या चर्चमधली आतली सजावट अतिशय आकर्षक आहे. पोर्तुगीजांनी गुलामांना ख्रिश्चन धर्मात प्रवेश करायला भाग पाडले. परंतु त्याना युरोपियन लोकांच्या चर्चमध्ये प्रवेश नव्हता. त्यांच्यासाठी आणखी वेगळे चर्च बांधण्यात आले. त्यामुळे चर्चची संख्या वाढत गेली. आमच्या मित्रांनी मला चर्च ऑफ नोसा सेनोरा डो रोझारिओ (Church of Nossa Senhora do Rosario) पाहण्याचा आग्रह केला. त्या दोघांबरोबर मी आत जाऊन आलो. आतला भाग खूपच सुंदर रीतीने सजविला आहे.



चर्चच्या आतील कलाकुसर

माणसाच्या सद्गुणापेक्षा त्याने केलेल्या चुकांवरून आपण कधी कधी जास्त शहाणपण शिकू शकतो. - लाँगफेलो

गावातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उत्तम आहे. रस्ते दगडांचे, अरूंद आणि वळणावळणाचे असल्याने येथे लहान आकाराची बस चालवावी लागते. बसमध्ये प्रवेश पुढच्या बाजूने घ्यायचा असतो. दाराजवळच एका उंच खुर्चीवर कंडक्टर बसलेला किंवा बसलेली असते. तिथे तिकीट घेतल्यानंतरच आत प्रवेश करता येतो. साठ वर्षांहून अधिक वय असलेल्या व्यक्तीला बसचा प्रवास मोफत आहे. त्याचा फायदा मी शहरात फिरण्यासाठी करून घेतला.



**शहर वाहतुकीची बस**

गावात युनिव्हर्सिडॅड फेडरल डा ऑऊरो प्रेटो (Universidade Federal da Ouro Preto) नावाचे एक शासकीय विद्यापीठ आहे. स्कूल ऑफ फार्मसी आणि स्कूल ऑफ माईन्स या जुन्या दोन शैक्षणिक संस्थांना एकत्र करून १९६९ मध्ये या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. जुन्या दोन विभागांबरोबरच इतर अनेक शैक्षणिक विभाग निर्माण करण्यात आले. विद्यापीठ एका डोंगरावर आहे. हा भाग मूळ गावाच्या हद्दीत नसल्याने तेथे युनेस्कोची बंधने लागू होत नाहीत. त्यामुळे तेथील इमारती आणि रस्ते आधुनिक आहेत. विद्यापीठ तीन ठिकाणी विखुरलेले आहे. या तिन्ही ठिकाणी मिळून जवळजवळ १४ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे विद्यापीठ शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीत येते. विद्यापीठ चालविण्यासाठी लागणारा सगळा खर्च केंद्र शासन करते. त्यामुळे येथे शिक्षण घेणारा विद्यार्थी शिक्षण शुल्क भरत नाही. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण येथे मोफत दिले जाते. मात्र या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी एक कठीण परीक्षा द्यावी लागते. आजूबाजूच्या अनेक देशातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी या विद्यापीठात येतात.




**विद्यापीठाची मुख्य इमारत**

विद्यापीठात दूरस्थ शिक्षण विभाग (Distance Education Department) देखील आहे. विद्यापीठात येऊन शिक्षण घेणे ज्यांना शक्य नाही असे लोक दूरस्थ शिक्षण घेऊन पदवी मिळवतात. या विभागात नोंदणी करण्यासाठी देखील प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण करावी लागते. त्यानंतर त्या विद्यार्थ्याला त्याच्या जवळ असलेल्या केंद्रांशी जोडले जाते. तिथे नियमितपणे जाऊन त्यांनी स्काईप मार्फत धडे घ्यायचे असतात. माझे मित्र प्राध्यापक मिल्टन रोजा (Professor Milton Rosa) हे दूरस्थ शिक्षण विभागाचे प्रमुख आहेत. या विभागाच्या वतीने माझे विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे माझे व्याख्यान तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी ऐकलेच त्याचबरोबर वेगवेगळ्या केंद्रावर उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी देखील ऐकले. 'भारतीय गणितीय परंपरा' (Tradition of Mathmatics in India) असा विषय मी माझ्या व्याख्यानासाठी निवडला होता. या विषयातले त्यांचे ज्ञान फारच कमी होते. किंबहुना भारताने गणित विश्वात मोलाची भर घातली याची त्यांना कल्पनाच नाही. माझ्या व्याख्यानाने ही जाणीव त्यांच्यात निर्माण करून दिली.

(पृष्ठ क्र.१० वर)

जी चूक प्रामाणिकपणे हातून घडली असेल तिची कुचेष्टा न करता तिचा सहानुभूतीने विचार केला पाहिजे. - लॉर्ड चेस्टरफील्ड

# मूल्यवेध-०९: दखल

*आपल्या जीवनात वास्तवाची दखल घेणे किती मोलाचे असते हे या लेखात विशद केले आहे - संपादक*

आपल्या अवतीभवती निरंतर घटना घडतच असतात. त्यांची दखल आपण घेत असतो. घेऊ शकत असतो. घेतली तरच आपण संवेदनाशील म्हटले जाऊ शकतो. एरव्ही त्या घटनांकडे बघूनही न बघितल्यासारखे करता येते. त्यांवर प्रतिसाद देणे टाळता येते. प्रत्येक घटनेबाबत आपण काय करायचे ह्याचा निर्णय ज्याचा त्याने करायचा असतो. दखल मोलाची असते. मात्र आपण ती घेतोच असे नाही.

परवाच्या दिवशी मी असाच घरी परत येत होतो. रस्त्याच्या कडेच्या एका कट्ट्यावर एक दहा-बारा वर्षांची मुलगी रडवेली होऊन बसलेली होती. जाणाऱ्या येणाऱ्या पुढे हात करत होती. भिकारी वाटत नव्हती. शक्यता अशीही होती की ती हरवलेली असू शकेल. आईबाबाच तिला सापडत नसतील. एकदा मनात विचार आला की, बघावे तिला काय झालंय? विचारावे तिला काय हवंय? पण मग पुढचा विचारही मनात ताबडतोब झाला. समजा खरंच तिला काही हवे असेल, तर आपण ते देऊ शकणार आहोत का? तिच्या आप्तेष्टांचा शोध लावून देऊ शकणार आहोत का? नाही ना? मग असू दे की तिला आहे तशी. ज्यांना झेपेल ते मदत करतील. पण तिच्या नजरेतल्या सवालाचा जबाब काही माझ्याकडे नव्हता. मला स्वतःचेच फार वाईट वाटले. काय ही अवस्था आपली. व्यक्ती म्हणून कदाचित आपण तिला मदत देऊही शकत नसू, पण आपला समाज तरी तिच्यासाठी काहीच का करू शकत नाही ह्याचेही वाईट वाटले. प्रत्येक असहाय्य, निराधार, अडचणीत सापडलेल्या माणसाला न मागता, यथोचित मदत मिळू शकणे, मिळणे हेच समाजाच्या उन्नतीचे निदर्शक आहे. दुर्दैवाने तशी स्थिती नाही. मात्र मी दखल घ्यायला हवी होती हे नक्की!

१९-१०-२०१८ रोजी, अमृतसरमध्ये रेल्वेलाईनच्या बाजूलाच दसऱ्याचा रावण दहनाचा कार्यक्रम चालू होता. कार्यक्रमात फटाके फुटत होते आतषबाजी सुरू होती. रावणाचा पुतळा वेगाने आग पकडतांना दिसत होता. ते अपरूप पाहण्याकरता खूप गर्दी जमलेली होती. लोक मैदानाबाहेरही ओसंडून वाहत होते. रेल्वेलाईन उंचावर होती. तिथून दृष्य छान दिसेल म्हणून लोक तिच्यावर चढून उभे राहत होते. रोषणाई पाहत होते. अवचितच दोन्ही दिशांनी आगगाड्या आल्या. रेल्वेलाईनवर उभे असलेले लोक कार्यक्रमाच्या आस्वादातच तल्लीन होते. त्यांनी गाड्यांची हवी तशी दखलच घेतली नाही. किंबहुना त्यांना गाड्या येत आहेत हे कळलेसुद्धा नाही आणि कळले तेव्हा काही हालचाल करायच्या आतच गाड्या त्यांच्यावरून पार झाल्या. ज्यांना त्या क्षणार्धात वर्तमानाची दखल घेता आली, त्वरेने हालचाल करून गाड्यांच्या वाटेतून शिताफीने बाजूला होता आले ते बचावले. ६१ लोक पाहता पाहता मृत्युमुखी पडले. मात्र त्यांनी दखल घ्यायला हवी होती हे नक्की!

आपल्याच विचारांत, बोलण्यात, कृतींत तल्लीन राहण्याचे हे काही एकमेव उदाहरण नाही. ते विदारक होते. ते माध्यमांच्या झोतात आले म्हणून सगळ्यांना

---

चूक ही एक चिवट वनस्पती आहे, ती वाटेल त्या भूमीत फोफावते. - मार्टिन रूपर

माहीत झाले. दररोज, कानात भ्रमणध्वनीतील श्राव्यसंगीत ऐकवणारी बुचे घालून, रस्तोरस्ती प्रियजनसंवाद करत, हातवारे करत, तावातावाने गतीमान असलेल्या व्यक्ती; आसपासच्या रहदारीची हवी तशी दखल घेऊ शकत नाहीत. अनुचित व्यग्रतेने ते आपल्यावरच संकटे ओढवून घेत असतात. एवढेच नव्हे तर इतरांचे जीवासही धोका निर्माण करत असतात, ह्यात शंकाच नाही. त्यांनी आसपासच्या परिस्थितीची दखल घ्यायला हवी हे नक्की!

न जाणो आपल्याला कुणाला, काही तरी मदत करावी लागेल, म्हणून आसपासच्या व्यक्तींच्या लक्षवेधी निवेदनांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. व्यक्ती स्वमग्न होत चालल्या आहेत. कुठे तरी असे वाटते आहे की, हे बरोबर नाही. आपली स्वमग्नता कमी करण्याची गरज आहे. इतरांना मदत करण्याची आवश्यकता आहे. वाढत्या आयुर्मर्यादेसोबतच अकार्यक्षम व्यक्तींचे समाजातले प्रमाणही वाढते आहे. कार्यरत व्यक्तींनी ज्यांना मदत करायला हवी आहे, अशा अकार्यक्षम व्यक्तींचे प्रमाण वाढत आहे. त्याच वेळी कार्यरत व्यक्ती अधिकाधिक स्वमग्न होऊ पाहत आहेत. त्यामुळे समाज अस्वस्थकडे वाट चालत आहे. ह्या बदलत्या वास्तवाचे भान न कार्यरत व्यक्तींना आहे, न अकार्यक्षमतेची वाट चालणाऱ्यांना. प्रत्येकानेच हे वास्तव स्वीकारून आपल्याकडूनच्या समाजाच्या अपेक्षांची दखल घ्यायला हवी आहे हे नक्की!

समजा दखल घ्यायला हवी आहे आणि दखल नाही घेतली गेली तर काय बिघडणार आहे मोठेसे? बरेच काही बिघडणार आहे. बिघडत आहे. समाज अस्वास्थ्याची वाट चालत आहे. प्रत्येकाने वास्तवाची दखल घेतली नाही, तर समाजाकडूनच्या त्याच्या अपेक्षा वाढत जातात, जबाबदारीची जाणीव घटत जाते. त्यामुळे समाजातील एकूणच अपेक्षापूर्तीचे प्रमाण घटत जाते. अपेक्षाभंगासारखे दारूण दुःख नसते. त्यामुळे दुःखही वाढत जाते. त्यास आळा घालणे गरजेचे आहे. समाजातील संतोष आणि समाधान वाढवणे गरजेचे आहे. त्याकरता समाजाकडूनच्या व्यक्तींच्या अपेक्षा प्रमाणात बसवण्याची गरज आहे. त्या घटवण्याची गरज आहे. सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढवण्याची गरज आहे. ह्या साऱ्या वास्तवाची प्रत्येकानेच दखल घ्यायला हवी आहे हे मात्र नक्की!

तर लोकहो, चला आपण वास्तवाची दखल घेण्याकरता सिद्ध होऊ या. संवेदनशील होऊ या. समाजाभिमुख होऊ या. जबाबदार होऊ या. दखल घेऊ या वास्तवाची.

**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

नद्यादेखील समुद्राकडे इतक्या वेगाने जात नसतील इतक्या वेगाने मानव हा चुकीच्या मार्गाकडे वाहत जात असतो. – वोल्टेर

# ओळख वनस्पतींची
## धामण

*'धामण' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक*

मित्रांनो, बऱ्याचशा गोष्टी अतिपरिचित म्हणून त्याकडे आपण फारसे गांभीर्याने पाहत नाही. आमच्या घराशेजारीच असलेले एक झाड बऱ्याच दिवसांपासून तिथे असूनही त्याबाबत अधिक माहिती घेण्याची किंवा निरखून बघण्याची गरजच भासली नाही. मात्र त्या झाडाला फळे आली की अनेक पक्ष्यांचा डेरा तिथे हमखास असणार. झाड जरा उंच असल्याने व फळांचा आकार वाटाण्याएवढाच असल्याने फळांचे अस्तित्व कधी जाणवलेच नाही. मात्र ज्यावेळी पक्ष्यांचा तसेच खारुताईचा वावर त्या झाडावर वाढला आहे. त्यावेळी त्याला फळे आली असावी असे वाटून जरा निरखून पाहिले तर काळपट रंगाची पिकलेली, तसेच काही हिरव्या पोपटी रंगाची कच्ची फळे हमखास दिसतात. पानांच्या रंगात ही कच्ची फळे मिसळून गेल्यामुळे अगदी टक लावून बघितल्याशिवाय दिसणे अशक्य. फुलांचेही तसेच. पिवळ्या रंगाची सुमारे १.५ ते २.९० सें.मी. आकाराची फुले पानांच्या पसाऱ्यात सदा हरवलेली. त्यामुळेच की काय त्यांची मुद्दाम दखल घ्यावी असे यापूर्वी वाटले नाही. मात्र जेव्हा या फुलांचे मुद्दाम जवळून निरीक्षण केले तेव्हा त्यांची दखल घ्यावीच लागली. या झाडाचे नाव आहे धामण.



धामण हे एक मध्यम उंचीचे झाड आहे. उंची साधारण ७ ते ८ मीटर. भारताच्या पश्चिम भागात हे झाड प्रकर्षाने आढळते. कोकणात सर्वत्र दिसून येते. आकार काहीचा अनियमित. खोड राखाडी रंगाचे व खडबडीत. कोवळ्या फांद्यांवर बारीक लव. पाने ७ ते १८ सें.मी. लांब व ६ ते १२ सें.मी. रुंदीची. आकार हृदयाकृती. पानाच्या कडा दातेरी. पाने वरून गुळगुळीत, मात्र खालचा पृष्ठभाग केसाळ. पर्णतळ गोलाकार. या झाडाला एप्रिल ते जुलै या दरम्यान पिवळ्या रंगाची फुले येतात. ही फुले गुच्छांच्या स्वरूपात असून गुच्छात ८ ते १२ फुले असतात. फुलांचा व्यास साधारण १.५ ते २.०० सें.मी. एवढा. या फुलांचे वैशिष्ट्य म्हणजे सहज नजरेस भरणारे पाच थर. पहिला थर पाच पाकळ्यांप्रमाणे दिसणारा संरक्षक पुष्पपटलाचा. हे पुष्पपटल मांसल व केसाळ पाकळ्यांसारखे दिसतात व रंगही पिवळाच. त्यामुळे त्या पाकळ्याच वाटाव्या असे. दुसरा थर असतो ४ ते ५ हिरवट पिवळ्या पण पाकळ्यांसारखाच दिसणार संरक्षक कवचाचा दुसरा भाग. पहिल्या थरातील पुष्पपटल मागे वळून गोलाकार वेटोळे केलेले तर हे पटल कवचासारखे फुलांना घट्ट बिलगून असलेले. तिसरा थर असतो तो खऱ्याखुऱ्या पाकळ्यांचा. या पाकळ्या टोकेरी असून मध्यभागी फुगीर व कडा मागे वळलेल्या. रंग पिवळा. चवथा अन् लक्ष वेधून घेणारा थर असतो तो पिवळ्या टोप्या धारण केलेल्या व खूप गर्दी केलेल्या पिवळ्या रंगाच्या पुंकेसराचा. हे लांबडे पुंकेसर जसजसे जुने होतात तसा त्यांचा रंग केशरी होतो. टोप्या मात्र पिवळ्याच असतात. पाचवा अन् फिक्कट पिवळ्या रंगाचा हा थर म्हणजे पुंकेसरांच्या गर्दीमधून मधोमध उंच आलेला जाडसर स्तंभासारखा दिसणारा व डोक्यावर हिरव्या पोपटी रंगाची केसाळ पगडी धारण केलेला स्त्रीकेसर. अशा

---

चुकणे हे मानवाचे लक्षण आहे; पण हट्टाने चुका करत राहणे हे सैतानाचे लक्षण – सेंट ऑगस्टिन

या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे हे फुल आपले लक्ष वेधून घेते. मात्र ही फुले फांद्यांच्या टोकाशी असल्याने व पानांच्या पोपटी हिरव्या रंगात काही प्रमाणात मिसळून गेल्यामुळे लांबून लक्षात येत नाहीत.

जुलै ते सप्टेंबर या काळात या झाडावर वाटाण्याच्या आकाराची हिरवी फळे दिसू लागतात. ही फळे पिकली की झाडावर पक्ष्यांची वर्दळ सुरू होते अन् केवळ तेव्हाच या झाडाकडे आपले लक्ष वेधले जाते. ही फळे काळपट जांभळ्या रंगाची व चविला आंबट तुरट अशी असतात. खारी आणि पोपट तर ही फळे पिकण्यापूर्वीपासूनच झाडावर येत असतात. फळांना गर असा फारसा नसतोच. आत एक आठळीवजा बी असते.

या झाडाचे शास्त्रीय नाव Grewia Tiliaefolia. या झाडाचे औषधी उपयोग मलातरी फारसे माहीत नाहीत. पण याच कुटुंबातील फालसा या झाडाच्या औषधी उपयोगाबाबत बरीच माहिती उपलब्ध आहे. फालसाचे शास्त्रीय नाव आहे Grewia asiatica. या झाडाची उंची कमी असून फळांमध्ये गर जास्त असतो. या गरापासून फालसा हे सरबत तयार केले जाते. हल्ली बऱ्याच भागामध्ये फालसाची शेती केली जाते. पानांची व फुलांची रचना दोन्हीची जवळपास सारखीच आहे. फालसाची पिकलेली फळे गोड व तुरट चवीची असून ती पाचक व शक्तीवर्धक आहेत. जळजळ व सारखी तहान लागणे यावर ती उपयोगी आहेत. सालीचा वापर त्वचारोगासाठी केला जातो. शिवाय इतरही अनेक उपयोग आहेत.

धामण सध्यातरी केवळ जंगल परिसरात, शेतांच्या बांधावर किंवा पडीक जमिनीवरच दिसून येते. याची मुद्दाम कोणी लागवड करीत नाही. पण या झाडावरील पक्ष्यांचा वावर व वैशिष्ट्यपूर्ण फुले लक्षात घेता हे झाड नक्कीच महत्त्वपूर्ण आहे.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

(पृष्ठ क्र. ६ वरून – **आऊरो प्रेटो: एक सुवर्ण नगरी**)



**भारताची गणितीय परंपरा या विषयावरील व्याख्यान**



**एक विचित्र माकड**

आऊरो प्रेटो या शहराला दिलेली भेट माझ्या अनेक वर्षे स्मरणात राहील अशीच होती. त्यातील सगळ्यात स्मरणात राहणारी बाब म्हणजे मी तिथे पाहिलेले एक विचित्र माकड. आम्ही शहराचा फेरफटका मारत असताना एका झाडावर उड्या मारणाऱ्या प्राण्याने माझे लक्ष वेधून घेतले. ते एक वेगळ्याच जातीचे माकड होते. असे माकड मी याआधी कधीच पाहिले नव्हते. म्हणून मी लगेच त्याचा फोटो घेतला. तो देत आहे.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा,
वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे – ४२१२०४

# 'कैलासराणा शिवचंद्रमौळी'

## भाग : ४

*भगवान शिवाचे महात्म्य व बारा ज्योतिर्लिंगांविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

तमीळनाडूतील भगवान शिव व माता पार्वतीशी संबंधीत असलेले अजून एक महत्त्वाचे ठिकाण म्हणजे मदुराई हा जिल्हा होय. तमीळनाडूच्या साधारणतः मध्यभागी वसलेल्या ह्या ठिकाणीदेखील अनेक मंदिरे आहेत. येथील मंदिरे द्रविड स्थापत्य कलेसाठी प्रसिद्ध असून येथील सर्वात महत्त्वाचे मंदिर 'मिनाक्षी' हे मंदिर आहे असे म्हणावे लागेल. मिनाक्षीदेवी ही माता पार्वतीचा अवतार मानली जाते व येथे भगवान शिव सुंदरेश्वरार (मराठीत सुंदरेश्वर म्हणता येईल) या नावाने प्रसिद्ध आहेत. मिनाक्षी देवीला भगवान विष्णुची बहीण मानली जाते. इसवीसनाच्या १४ व्या शतकात अल्लाउद्दीनचा सेनापती मलीक कफूर याने ह्या मंदिरावर हल्ला करून त्याची नासधूस केली होती व मंदिराची लूटदेखील केली होती. सध्याच्या मंदिराचा जीर्णोद्धार विजयनगरच्या हिंदू राजांनी केला असल्याची माहिती मिळते. ह्या मंदिराला जवळ जवळ १४ गोपुरे आहेत व येथे इतरही देवदेवतांची देवळे आहेत. कारण हा एक मंदिर समूह आहे. येथे भगवान विष्णूशी संबंधीत शिल्पे देखील कोरलेली आढळतात. याचे कारण, मिनाक्षी मातेला भगवान विष्णूची बहीण मानली जाते. तसेच या ठिकाणाचा उल्लेख भक्तगण दक्षिणेकडील मथुरा असा देखील करताना आढळतात. दरवर्षी मदुराई या ठिकाणाला व मिनाक्षी मंदिराला लाखो भाविक भेट देत असतात. काही स्तोत्रांमध्ये येथे लहान मोठी मिळून सत्तावीस गोपुरे असल्याची माहिती मिळते. येथील मीनाक्षी देवीची मूर्ती द्विभुज असून ती उभी आहे व ही पूर्वाभिमुख मूर्ती काळ्या पाषाणापासून बनविलेली आहे. आपण अगोदर पाहिल्याप्रमाणे येथील आवारात सुंदरेश्वर शिवमंदिर आहे. ह्या मंदिरात दक्षिणेतील व प्रामुख्याने तमीळनाडूतील अनेक शैव संतांच्या मूर्ती आढळतात. पंडित महादेव शास्त्री जोशी संपादीत 'भारतीय संस्कृतिकोश' सहाव्या खंडात शंकराचार्यांनी मीनाक्षी मातेचे स्तवन केलेला संस्कृत श्लोक व त्याचा मराठीत अर्थ दिला आहे. सदर श्लोक व त्याचा मराठीतील अर्थ वाचकांसाठी खाली उद्धृत करत आहोत,

''नानायोगिमुनीन्द्रहृन्निवसती नानार्थसिद्धीप्रदां
नानापुष्पविराजिताङ्घ्रियुगलां नारायणेनार्चिताम्।
नादब्रह्ममयीं परात्परतरां नानर्थतत्वात्मिकां
मीनाक्षीं प्रणतोऽस्मि सन्ततमहं कारुण्यवारां निधिम्।।

वरील श्लोकांचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे - नाना योगी व मुनिश्रेष्ठ यांच्या हृदयात निवास करणारी, नाना अर्थ व सिद्धी देणारी, नाना पुष्पांनी जिची चरणकमले विराजित आहेत अशी, नारायणाने पुजिलेली, नादब्रह्ममयी, परात्परतर, नाना अर्थ व तत्त्वे यांचा आत्माच असलेली आणि करुणासागर अशा मीनाक्षीला मी सतत नमस्कार करतो.

आपण अगोदर रामेश्वरम्‌चा उल्लेख केलेलाच आहे. रामेश्वरम् हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मानले जाते व येथील शिवलिंग स्वतः सीतामातेने वाळूपासून बनविले होते अशी कथा ऐकावयास मिळते. रामेश्वरम्‌चे मंदिर वा देवालय तमीळनाडूमधील रामनाथपुरम् जिल्ह्यात असून हे मंदिर बंगालच्या उपसागरातील पांबन बेटावर आहे. रामेश्वरम् हे बेट तमीळनाडूच्या मुख्य भूमीपासून पांबनच्या सामुद्रधुनीमुळे वेगळे झाले आहे व हे ठिकाण

श्रीलंकेच्या मन्नर बेटापासून अवघ्या चाळीस किलोमीटर एवढ्या अंतरावर आहे. पांबन बेटाला रामेश्वरम् बेट असे देखील म्हणतात. रामेश्वरम् बेटाला जोडणारा लोहमार्गाचा पूल हा जगप्रसिद्ध असून अर्थात हा समुद्रातून जातो म्हणजेच समुद्रात बांधलेला असून हा पूल व लोहमार्ग जगातील सर्वात धोकादायक पूल व लोहमार्गांपैकी एक मानला जातो. याचे कारण समुद्र खवळलेला असताना समुद्राच्या लाटा ह्या लोहमार्गावर व आगगाडीवर उसळतात. काशीची यात्रा करणारे लोक रामेश्वरम्ला आवर्जून येत असतात. किंबहुना रामेश्वरम्ला गेल्याशिवाय काशीयात्रा सफल होत नाही असे देखील बरेच भक्तगण मानतात. रामाने लंकेला जोडणारा सागरी सेतू (राम सेतू) येथेच बांधला होता असे म्हटले जाते. रामेश्वरम् हे भारतातून श्रीलंकेत जाण्यासाठीचे सर्वात जवळचे ठिकाण होय. येथील सर्वात प्रसिद्ध असे रामनाथस्वामी मंदिर होय. येथेच येथील ज्योतिर्लिंग स्थित आहे. येथे इतरही अनेक मंदिरे आहेत. रामेश्वरम् बेटाचे अतिशय दक्षिणेकडचे टोक म्हणजे धनुष्यकोडी हे होय. येथील मंदिराला अनेक गोपुरे असून त्यावर व मंदिरातील स्तंभांवर चांगले कोरीव काम केलेले असून विविध देव-देवतांची शिल्पे देखील कोरलेली आहेत. हे मंदिर रामेश्वरम् बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. येथे रामेश्वराव्यतिरिक्त पार्वती माता, षडानन व गणपतीचे देखील मंदिर आहे.

तमीळनाडूतील शैव पंथियांसाठी महत्त्वाचे मानले जाणारे अजून एक ठिकाण म्हणजे कन्याकुमारी हे होय. हे ठिकाण अरबी समुद्र, बंगालचा उपसागर व हिंदी महासागराच्या संगमावर असून येथील कन्याकुमारीचे मंदिर प्रसिद्ध आहे. कन्याकुमारी ही माता पार्वतीचाच अवतार मानली जाते. त्यामुळेच शाक्त व शैव पंथियांसाठी हे ठिकाण महत्त्वाचे आहे. येथेच समुद्रामधील खडकावर (शिळेवर) स्वामी विवेकानंदांनी ध्यानधारणा केली होती. काही भक्तगण ह्या ठिकाणाला शक्तीपीठ मानतात व येथे नवरात्रौत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

आंध्र प्रदेशातील चित्तूर ह्या जिल्ह्यातील श्रीकलाहस्ती येथील शिवमंदिरदेखील फार प्रसिद्ध आहे. येथेच कन्नाप्पा ह्या शैव संताने भगवान शिवाला आपले नेत्र अर्पण करण्याची देखील तयारी दर्शविली होती असे म्हटले जाते. परंतु भगवान शिवाने त्याला तसे करण्यापासून परावृत्त करून त्याला मुक्ती दिली होती असे भक्तगण मानतात. येथील मंदिराच्या विविध भागांचे निर्माण करण्याची प्रक्रिया इसवीसनाच्या ५ व्या शतकापासून सुरू झाली असावी व चोल राजांनी तसेच विजयनगरच्या राजांनी ह्या मंदिराच्या विस्तारास व जीर्णोद्धारास वेळोवेळी हातभार लावला असावा असे सांगितले जाते. येथे वायू देवतेने भगवान शिवाची आराधना केली होती अशी कथा सांगितली जाते. या ठिकाणाविषयीची सांगितली जाणारी अजून एक कथा अशी की, भगवान शिवाने पार्वती मातेला शाप देऊन तिचे सौंदर्य हिरावून घेतले होते. तेव्हा पार्वती मातेने येथेच भगवान शिवाची आराधना करून त्याला प्रसन्न करून घेतले होते. तेव्हा भगवान शिवाने प्रसन्न होऊन पार्वती मातेला पूर्वीपेक्षाही जास्त रुपवान बनविले असे सांगितले जाते. येथील शिवलिंग हे वायुलिंग म्हणून प्रसिद्ध आहे. पंचभूत शिवलिंगाचे हे एक उदाहरण होय. कलाहस्तीला दक्षिणेकडची काशीदेखील म्हटले जाते. येथे वाचकांसाठी अजून एक माहिती द्यावीशी वाटते व ती ही की, श्री शैलम् हे शेषनागाच्या शेपटीवर वसलेले देवस्थान आहे, तर तिरुपती (भगवान विष्णूचे स्थान - बालाजी) हे अनंतशेषाच्या फण्यावर वसलेले असून कलाहस्ती हे शेषाच्या जीभेवर वसलेले आहे असे मानले जाते.

अशातऱ्हेने भारताच्या सर्वच भागांमध्ये भगवान शिवाची मंदिरे व त्याच्याशी निगडित विविध पवित्र स्थळे आहेत. एका अर्थाने संपूर्ण भारतवर्ष हे 'शिवमय' आहे. भारत वर्षाला 'शिवालय' असे म्हटल्यास वावगे

---

विचार आणि अंतःकरण यांच्या अभावामुळे माणसे दुष्कृत्ये करतात. - थॉमस हूड

ठरू नये. कारण भगवान शिव आपली कृपादृष्टी नेहमीच भारतवर्षावर ठेऊन असतो, अशी भक्तांची श्रद्धा आहे व ती योग्यच आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये राजाही देवांना आपला स्वामी व राजा मानत असे अशी परंपरा निदर्शनास येते. अगदी महाराष्ट्रातही पंढरपूरच्या विठोबा माउलीलाही अनेक राजे आपला राजा मानत असत. जसे भक्तगण व संतगण ज्ञानेश्वर माउलींना ज्ञानियांचा राजा मानत होते. त्याचप्रमाणे स्वतः राजेदेखील विठोबाला म्हणजेच देवाला आपला राजा मानत असत. अशीच संकल्पना दक्षिण भारतात देखील प्रचलित होती अशी माहिती आपणास मिळते. दक्षिण भारतात अनेक राजांनी वा राजवंशांनी भगवान शिवाला राजांचाही राजा मानले असल्याचे आपल्या निदर्शनास येते. याविषयाबाबतचे विवेचन व विश्लेषण महाराष्ट्रातील थोर संशोधक रा. चिं. ढेरे यांनी आपल्या 'संत, लोक व अभिजन' ह्या पुस्तकात अतिशय सुरेख केले आहे. रा. चिं. ढेरेंचे ह्या पुस्तकातील सदर विवेचन वाचकांसाठी खाली उद्धृत करत आहोत–

''ज्ञानदेवांनी आणि ज्ञानदेवादी संतांनी आपल्या भावबळाने पुष्ट केलेले श्रीकृष्णाचे, कृष्णरूप विठ्ठलाचे हे देवचक्रवर्तिपद सर्व संतवाङ्मयात अभिमानाचा विषय होऊन राहिले आहे. या चक्रवर्ती राजाचे पवाडे गाण्यात आणि त्याची बिरुदे गाजवण्यात संतांनी धन्यता अनुभवली आहे. 'विठू पंढरीचा राजा' हा भाव त्यांनी आपल्या गीतांतून पुन्हा पुन्हा आळवला आहे. पंढरपुरात राहणारे श्रीधरस्वामी नाझरेकर या प्रासादिक कवींनी पंढरीचे वर्णन 'विठ्ठलाची राजधानी' म्हणूनच केले आहे.[३]

**देवसत्तेचा दक्षिणेतील प्रभाव**

देवाचे हे राजेपण केवळ विठ्ठलभक्तिक्षेत्रातच आहे काय? केवळ वारकरी संतांनीच ही सत्तासंकल्पना स्वीकारली आहे काय? या दृष्टीने आपण शोध घेऊ लागलो, तर आपल्याला असे आढळून येते की, मध्ययुगात संपूर्ण दक्षिण भारतात या सत्तासंकल्पनेचे प्रभुत्व ठसठशीत स्वरूपात आढळून येते. अगदी आपल्याकडेही शिवभक्तीच्या क्षेत्रात राजबिरुदावलीचा वापर केलेला आढळतो. उस्मानाबाद जिल्ह्यात तोरंबा नावाच्या गावी भूपालतिलक जगद्देव व राजाचा शके ११२१ मधील एक कोरीव लेख उपलब्ध झालेला आहे.[४] सोलापूरच्या कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाच्या अंगभोग–रंगभोगादी नित्योपचारांसाठी राजाने दिलेल्या दानाची नोंद या लेखात केलेली आहे. ही नोंद करताना देवाच्या नावाचा निर्देश कसा केला आहे, तो पहा–

**''श्रीसिद्धरामनाथदेवनिर्मित – नवश्रीशैळकविलाशपुर – संज्ञक–परमप्रियक्षेत्र–सोंनलीपुरवराधीश्वर श्रीकपिल – सिद्धमल्लिकार्जुनदेव...''**

सोंनलीपुर म्हणजे सोलापूर. तिथे सिद्धरामेश्वर या वीरशैव भक्ताने श्रीशैलींच्या मल्लिकार्जुनाचे एक ठाणे ''कपिलसिद्ध मल्लिकार्जुन'' या नावाने उभारले आहे. भूपालतिलक जगद्देव हा बाराव्या शतकातील राजा मल्किर्जुन शिवाला 'सोंनलीपुरवराधीश्वर' या राजबिरुदाने उल्लेखितो, हे मुद्दाम ध्यानी घेण्यासारखे आहे.

सुदूर तमीळनाडूत तर या देवप्रधान सत्तासंकल्पनेचे दर्शन फार झगझगीत स्वरूपात होऊ शकते.[५] तृतीय कुलोत्तुंग हा तेराव्या शतकातील राजा मदुरेच्या सुंदरेश्वरालाच खरा सत्ताधीश मानीत असे आणि 'आपण त्याचे प्रतिनिधी आहोत' या भूमिकेतून राज्य करीत असे. पांड्यांचा पराभव केल्यावर त्याने आपल्या विजयी वीरांचा सत्कार केला आणि 'विजय झाला आहे तो सुंदरेश्वराचा !' अशा श्रद्धेने मीनाक्षी–सुंदरेश्वराची त्याने रथातून मिरवणूक काढली. देवाच्या या विजययात्रेत राजा स्वतः इतर सामान्य भक्तजनांप्रमाणे रस्त्याने पायी चालला / मिरवणुकीतील गर्दीत मिसळून गेला. त्याने शिवाच्या मंदिराला जी दाने दिली आहेत, त्यांचा दाता प्रत्यक्ष शिव आहे आणि आपण ती दाने शिवाज्ञेनेच देत

आहोत, असा श्रद्धाभाव त्याने त्या दानलेखांत व्यक्त केला आहे.''

रा. चिं. ढेरेंच्या या पुस्तकात 'वीरनुक्कविजयम्' ह्या काव्याचा कर्ता कवी पुंगोइल नंबीला देवाने दान दिल्याचा उल्लेख आढळतो व दानलेखात त्यागराज म्हणजेच भगवान शिव पुंगोइल नंबीला 'पुत्र' म्हणतो अशी माहिती मिळते.'' (रा. चिं. ढेरे, 'संत, लोक व अभिजन'–पृष्ठ–६६ व ६७) रा. चिं. ढेरेंच्या ग्रंथातील वरील विवेचनावरून भारतात प्राचीन काळी राजे व सम्राट देवाला आपला राजा व स्वामी मानत असत हा आपला मुद्दा सिद्ध होतो. प्रामुख्याने दक्षिण भारतात तर, भगवान शिवाच्या आज्ञेवरून राजाने अमूक एक कार्य केले, दान केले व अगदी भगवान शिवाच्याच कृपेमुळे त्यांना युद्धात यश प्राप्त झाले, इत्यादी स्वरूपाची माहिती देणारे शिलालेख व इतर दस्तावेज सापडतात. रा. चि. ढेरेंच्या 'संत, लोक व अभिजन' ह्या पुस्तकात उल्लेखिलेल्या त्यागराज शिवमंदिरा विषयी माहिती आपण पुढे जाणून घेणारच आहोत.

तमीळनाडूतील भगवान शिवाशी निगडित असून एक महत्त्वाचे स्थान म्हणजे तिरुवन्नामलाई जिल्ह्यातील अरुणाचलम् येथील मंदिर होय. अरुणाचलम् हा एक डोंगर असून हा संपूर्ण डोंगर म्हणजे साक्षात महादेव होय असे भक्तगण मानतात. अरुणाचलम्, अरुणगिरी, अण्णामलाई, अरुणाचल, अरुणाई, सोणगिरी व सोनाचलम् या नावांनी देखील ओळखले जाते. अरुणाचल या शब्दाचा अर्थ लाल (तांबडा) पर्वत असा होता. तरुवन्नामलाई हा जिल्हा तमीळनाडूमधील तोंडाईमंडलम् वा तोंडाईनाडू ह्या उत्तरेकडील विभागात येतो. या तोंडाईमंडलम् ह्या विभागात चेन्नई, कांचीपूरम, तिरुवल्लूर, वेल्लोर, विलूप्पूरम् ह्या जिल्ह्याच्या अतिपूर्वेकडील भागाचा समावेश होतो.

अरुणाचलम् येथेच भगवान विष्णू व ब्रह्मदेवामध्ये श्रेष्ठत्वावरून भांडण चालू असताना भगवान शिव अग्निस्तंभाच्या रुपात प्रकट झाले होते अशी येथील लोकांची श्रद्धा आहे. वर्षभर भाविक अरुणाचलम् येथे येत असतात व ह्या पवित्र डोंगराला प्रदक्षिणादेखील घालत असतात. अरुणाचलम्चा प्रदक्षिणा पथ वा मार्ग जवळ जवळ चौदा किलोमीटर एवढा असून ह्या मार्गात एकूण वेगवेगळी आठ शिवलिंगे स्थिर आहेत. ह्या शिवलिंगांना एकत्रितरित्या अष्टलिंगे असे म्हटले जाते. ही अष्टलिंगे पुढीलप्रमाणे आहेत – इंद्र लिंग (पूर्व दिशेस), अग्नि लिंग (आग्नेय दिशेस), यम लिंग (दक्षिण दिशेस), निरुभी लिंग (नैऋत्य दिशेस), वरुण लिंग (पश्चिम दिशेस), वायू लिंग (वायव्य दिशेस), कुबेर लिंग (उत्तर दिशेस), इसानिय लिंग (ईशान्य दिशेस). अरुणाचलम्चे वैशिष्ट्य म्हणजे येथे देखील वायू, वरुण व अग्नि ही पंचमहाभूत शिवलिंगे आहेत. यातील अग्निलिंग हे प्रामुख्याने अधोरेखीत होते. याचे कारण असे की, येथे भगवान शिव अग्निस्तंभाच्या स्वरूपात अवतरले होते अशी धार्मिक कथा सांगितली जाते. अरुणाचलम् येथील मंदिर सुरेख व सुंदर असून ह्या मंदिराची गोपुरे खूप उंच आहेत. काही गोपुरांची उंची तर जवळ जवळ सहासष्ट मीटर एवढी आहे. येथील मंदिराचे निर्माण इसवीसनाच्या ११ व्या शतकापासून सुरू झाले असावे व विजयनगरच्या सम्राटांनीदेखील नंतरच्या काळात ह्या मंदिराच्या विस्तारात व जीर्णोद्धारास हातभार लावला असेल असे अभ्यासक म्हणतात.

अरुणाचल माहात्म्यामध्ये असे म्हटले आहे की, चिदम्बरम् ह्या ठिकाणाकडे पाहिल्यामुळे, तिरुवारूर येथे जन्मल्यामुळे, काशी येथे मृत्यू आल्यामुळे व अरुणाचलाविषयी फक्त मनात विचार केल्याने मुक्ती मिळते. आधुनिकीकरणामुळे व वाढत्या लोकसंख्येमुळे अरुणाचल ह्या पवित्र ठिकाणाची हानी व ऱ्हास होऊ नये म्हणून पीटर बर्कींग यांच्या पुढाकाराने अरुणाचलम् ह्या ठिकाणाला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून

जाहीर करावे असे प्रयत्न सुरू आहेत.

अरुणाचल माहात्म्यात उल्लेखिलेल्या तिरुवारूर या जिल्ह्यात भगवान शिवाचे प्रसिद्ध असे त्यागराज मंदिर आहे. येथे भगवान शिवाची पूजा शिवलिंगाच्या स्वरूपात होते. येथे पार्वती मातेस 'कोंडी' असे म्हटले जाते. त्यागराज मंदिराचा परिसर जवळ जवळ तीस किलोमीटर एवढ्या जागेत विस्तारलेला आहे. पल्लव, चोल व विजयनगरच्या राजघराण्यांनी ह्या मंदिराच्या निर्माणास व विस्तार तसेच जीर्णोद्धारास वेळोवेळी योगदान दिल्याचे अभ्यासकांचे मत आहे. येथे पश्चिम दिशेस कमलालयम् तळे आहे. दरवर्षी येथे साधारणतः एप्रिल ते मे महिन्यात रथयात्रा काढली जाते. येथील रथयात्रेसाठी वापरला जाणारा रथ अतिशय विशाल असून त्याचे वजन/वस्तुमान जवळ जवळ ३०० टन तर उंची साधारणतः ९० फूट एवढी असते.

आपण येथे भारतातील काही शैव पंथांचा उल्लेख करणे संयुक्तिक ठरेल. दक्षिण महाराष्ट्रात, मराठवाड्याच्या काही भागांत व कर्नाटकात आढळणारा एक प्रमुख 'शैव पंथ' म्हणजे 'वीरशैव' हा पंथ होय. अभ्यासक म्हणतात की, वीरशैव हा पंथ लिंगायत म्हणून देखील ओळखला जातो. या पंथाची स्थापना इसवी सनाच्या १२ व्या शतकात कर्नाटकात होऊन गेलेले संत बसवेश्वर वा बसवाण्णा यांनी केली आहे असे म्हटले जाते. काही अभ्यासकांचे असे मत आहे की, हा पंथ बसवाण्णांपूर्वीदेखील अस्तित्वात होता. एक बाब मात्र खरी व ती ही की बसवाण्णांनी हा शैव पंथ खऱ्या अर्थाने लोकप्रिय केला. या पंथाचे लोक फक्त भगवान शिवाचीच उपासना करतात व अनेकजण गळ्यात शिवलिंग घालतात. सध्या कर्नाटकात ह्या पंथाचे लोक त्यांच्या पंथाला, 'वेगळ्या धर्माचा दर्जा व मान्यता द्या' अशी मागणी करताना आढळतात. २०१८ साली कर्नाटक राज्यात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकां दरम्यान हा विषय फारच गाजला होता. असो.

काश्मीर या उत्तर भारतातील हिमालयाच्या कुशीत वसलेल्या राज्यातील अनेक हिंदूदेखील प्रामुख्याने 'शैव पंथीय' आहेत. काश्मिरी पंडित देखील प्रामुख्याने शिवाचीच उपासना करतात. काश्मीरमध्येच 'अमरनाथ'चे प्रसिद्ध शिवलिंग आहे. हिमालयात असलेले हे बर्फाचे शिवलिंग हिवाळ्यात आपोआप अवतीर्ण होते. लाखो हिंदू भावीक दरवर्षी जुलै–ऑगस्ट या महिन्यांमध्ये अमरनाथची यात्रा करतात. ठाण्याजवळचे अंबरनाथ (येथील ऐतिहासिक शिव मंदिराचा उल्लेख आपण अगोदर केलेलाच आहे) हे नाव 'अमरनाथ' ह्या शब्दाचाच अपभ्रंश होय असे काही लोक मानतात. अमरनाथ म्हणजेच 'विश्वात अमर असलेला भगवान शिव' असा याचा अर्थ होतो. अमरनाथच्या नैसर्गिक (बर्फाच्या) शिवलिंगाचा उल्लेख सुप्रसिद्ध अमेरिकन विदुषी डायना एल. येक यांनीसुद्धा आपल्या 'इंडिया–ए सेक्रेड ज्यॉग्रफी' ह्या पुस्तकात केला आहे. वाचकांनी हे पुस्तक जरूर वाचावे. 'काश्मीर शैव' पंथातील अनेक विद्वानांपैकी अभिनवगुप्त हा एक होय. याचा कालावधी इसवी सन सुमारे ९५० ते १०१६ असा होता असे अभ्यासकांचे मत आहे. तो एक तत्त्ववेत्ता, संगीतकार, कवी व नाटककार होता. त्याचबरोबर त्याचे तर्कशास्त्र व धर्मशास्त्रातील ज्ञान देखील वाखाणण्याजोगे होते. असा हा अनेक क्षेत्रांमध्ये पारंगत असलेला व अगाध ज्ञान असलेला अभिनवगुप्त शिवाचा उपासक होता. जयरथ (इसवी सन ११५० ते १२००) हा अभिनवगुप्तवरचा आघाडीचा व महत्त्वाचा टीकाकार असल्याचे मानले जाते. अनेक विद्वानांचे मत आहे की, अभिनवगुप्त हा अतिशय बुद्धिमान लेखक होता व काश्मीरमधील शैव पंथाच्या जडणघडणीत त्याचे महत्त्वाचे योगदान होते. अभिनवगुप्तचा भाऊ मनोरथ हा देखील शिवभक्त होता. अभिनवगुप्ताने विविध शाखांतील ज्ञान प्राप्त करण्यासाठी एकंदरीत पंधरा गुरूंकडून मार्गदर्शन घेतले होते असे मानले जाते. अभिनवगुप्तने आजीवन ब्रह्मचर्य स्वीकारले होते व ज्ञानोपासनेसाठी तो संपूर्ण काश्मीरभर हिंडला

---

जे कसलीच अपेक्षा करत नाहीत ते खरे भाग्यवान, कारण त्यांच्यावर निराश होण्याची पाळीच येत नाही. – वॉलकॉट

होता व वयाच्या ३० ते ३५ वर्षांपर्यंत त्याची ज्ञानोपासना चालली होती अशी माहिती आपणास मिळते. अभिनवगुप्तने रचलेल्या काही ग्रंथांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – तंत्रलोक, तंत्रसार, अभिनवभारती (भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्र' ह्या ग्रंथावरील टीका) इत्यादी. वाचकांना येथे एक माहिति द्यावेशी वाटते व ती ही की, विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकरांच्या मार्गदर्शनाखाली अभिनवगुप्त खुल्या रंगमंचाची स्थापना २०१८ साली करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत 'स्वरांजली' नामक कार्यक्रमाचे आयोजन विद्याप्रसारक मंडळाच्या विविध महाविद्यालयांतर्फे केले जाते. या स्वरांजली कार्यक्रमांतर्गत विद्याप्रसारक मंडळाच्या ठाणे येथील विविध महाविद्यालयांच्या प्रांगणात व सभागृहांमध्ये शास्त्रीय संगीताच्या (गायन व वादन) कार्यक्रमाचे आयोजन केले जाते व डॉ. विजय बेडेकर स्वतः ह्या कार्यक्रमांना उपस्थित राहत असतात. 'स्वरांजली' कार्यक्रमाची सुरुवात जोशी–बेडेकर महाविद्यालयापासून झाली व तद्नंतर मंडळाच्या बांदोडकर विज्ञान तसेच विधी महाविद्यालयांनी देखील ह्या सुरेख व सुरेल कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी स्वरांजली ह्या कार्यक्रमाचे आयोजन विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन महाविद्यालयाने केले होते. तसेच नुकतेच दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी जोशी–बेडेकर महाविद्यालयात स्वरांजलीतंर्गत 'मेघ–मल्हार' ह्या रागावर आधारीत गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. 'स्वरांजली' या कार्यक्रमाला विद्या प्रसारक मंडळ, ठाणे संचलित शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व प्राध्यापकवृंद, मुख्याध्यापक, प्राचार्य, संचालक, तसेच मंडळाशी निगडित इतरही काही व्यक्ती व मान्यवर उपस्थित असतात. या खरोखरच अभिनव अशा कार्यक्रमावरून डॉ. विजय बेडेकरांच्या 'खऱ्या' भारतीय संस्कृतीविषयक आस्थेविषयी व त्यांच्यातील सौंदर्यदृष्टीची कल्पना येते. त्यामुळेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेला कर्मचारी वर्ग खरोखरच भाग्यशाली आहे यात वाद नाही. असो.

अमिश त्रिपाठी ह्या लेखकाने 'शिवा ट्रिलॉजी' (Shiva Triology) अंतर्गत 'द इम्मॉर्टल्स् ऑफ द मेलूहाज्', 'द सिक्रेट ऑफ द नागाज्' व 'द ओथ ऑफ द वायुपुत्राज्' ही तीन अप्रतिम पुस्तके लिहिलेली आहेत. अमिशने ह्या तीन पुस्तकांना ('Fictional Biography of Lord Shiva') 'भगवान शिवाचे काल्पनिक चरित्र' असे म्हटले आहे. वाचकांनी ही तिन्ही पुस्तके वाचावीत. अमिशने हिंदू धर्मग्रंथांमधील संदर्भ घेऊन फारच छानरित्या ही त्याची तीन पुस्तके सिद्ध केली आहेत.

अमीश त्रिपाठीप्रमाणेच डॉ. देवदत्त पट्टनायक यांनीदेखील इंग्रजीमध्ये हिंदूधर्मग्रंथांवर व विविध देवतांवर तसेच पुराणकथा व हिंदू महाकाव्यांतील विविध घटनांवर, कथांवर व व्यक्तिमत्त्वांवर आधारित सुरेख लेखन केले आहे. त्यांच्या पुस्तकांची मराठी भाषेमध्येदेखील भाषांतरे झालेली आहेत. देवदत्त पट्टनायकांचे असेच एक पुस्तक भगवान शिवावर आहे व त्या पुस्तकाचे नाव – 'The Seven Secrets of Shiva'– 'द सेव्हन् सिक्रेटस् ऑफ शिवा', ह्या इंग्रजी पुस्तकाचे मराठीत 'भगवान शिवाची सात रहस्ये' या शीर्षकाने भाषांतर झाले आहे. सदर भाषांतर स्नेहलता दातार यांनी केले आहे. ह्या पुस्तकात त्यांनी शिवाच्या विविध रुपांविषयी अर्थात लकुलेश, भोलेनाथ, वीरभद्र, भैरव तसेच कालीमाता, माता पार्वती व पुराणांतील भगवान शिवाशी निगडित विविध कथांची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे भगवान शिवाच्या विविध मुद्रांचे, शरीरावरील चिन्हांचे–त्रिपुंड, त्रिशुल, डमरू, नाग तसेच इतर गोष्टींचे सुंदर विश्लेषण केले आहे. देवदत्त म्हणतात भगवान शिवाच्या गळ्यातील फणाधारी नाग हे स्थिरतेचे म्हणजेच स्थीर मनाचे प्रतीक आहे. तसेच दक्षिण भारतात अनेक ठिकाणी योगसूत्रे

लिहिणारा पतंजली हा महादेवाच्या गळ्यातील नाग होय व तो भगवान शिवाचा शिष्य असून त्याने भगवान शिवाच्या मार्गदर्शनानुसार योगसूत्रे लिहिली अशा स्वरूपाची मान्यता असल्याचे म्हटले आहे. भगवान शिवाच्या शरीरावरील भस्म हे अमरत्वाचे व अमर आत्म्याचे प्रतीक होय. कारण शरीरातून प्राण गेल्यावर शरीर जाळले जाते व शेवटी भस्म वा राख उरते व ही राखच खऱ्या अर्थाने अमर आहे अशा स्वरूपाचे विश्लेषण देवदत्त यांनी केले आहे. भगवान शिवाची सर्व ऊर्जा (उष्णता) त्याच्या शरीरातच साठलेली असते. त्यामुळे त्याच्या सभोवताली शीतल वातावरण असून सर्वकाही गोठून बनलेले बर्फ असते (हिमालय). देवदत्तने भगवान शिवाच्या तिसऱ्या डोळ्याला 'ज्ञानचक्षू व ज्ञानमार्ग दाखवणारा डोळा' असल्याचे विश्लेषण केलेले आहे. शिवाच्या कपाळावरील राखेच्या भस्माच्या तीन रेषा म्हणजेच त्रिपुंड. ह्या जगातील मर्त्य गोष्टी व मर्त्य जीवनाच्या प्रतीक आहेत व ह्या नष्ट पावल्यावर फक्त आत्माच उरतो व तोच खऱ्या अर्थाने अमर आहे असे दर्शवितात. भगवान शिवाने त्रिपुरासुरी एका सरळ रेषेत आल्यावर त्या पाशुपतास्त्राच्या सहाय्याने नष्ट केल्या व त्यापासून झालेली राख वा भस्म त्रिपुंड म्हणून कपाळावर लावली. भगवान शिवाच्या त्रिशूलाची तीन टोके असतात, कपाळावर भस्माच्या तीन रेषा (त्रिपूंड) असतात. डमरू दोन त्रिकोणांपासून बनलेला असतो, महादेवाला वाहिल्या जाणाऱ्या बिल्वपत्राची (बेलाचे पान) पानेदेखील तीन. अशातऱ्हेने भगवान शिवाची विविध आयुधे, शरीरावरील खूणा व चिन्हांचा अभ्यास करताना तीन ह्या आकड्यांना फार महत्त्व आहे. असे सगळे विवेचन व विश्लेषण देवदत्त पट्टनायक यांनी आपल्या 'द सेव्हन सिक्रेटस् ऑफ शिवा' या इंग्रजी पुस्तकात केले आहे. वाचकांनी देवदत्त पट्टनायक लिखित 'शिवा टू शंकर' (Shiva to Shankar) हे पुस्तक देखील जरूर वाचावे.

सर्वसाधारण हिंदूंची अशी श्रद्धा आहे की, भगवान शिव वा महादेव हिमालयातून संपूर्ण भारतवर्षावर आपले लक्ष व कृपादृष्टी ठेवून असतात. हिमालयातील अतिउच्च शिखरांवरून त्यांचे मुख दक्षिण दिशेकडे असते असे मानले जाते. म्हणून भगवान शिवाचा उल्लेख काही लोक 'दक्षिणमूर्ती वा दक्षिणमुखी' असा देखील करतात. याचाच अर्थ उत्तर भारतात जेथून भारताची सीमा सुरू होते तेथून ते भारताची सीमा दक्षिणेत (कन्याकुमारी) समुद्राजवळ संपते तेथपर्यंत संपूर्ण भारतावर भगवान शिव लक्ष ठेवून रक्षण करतात असे शिवभक्त मानतात. खरोखरच भगवान शिवाची ही दक्षिणमुखी संकल्पना म्हणजे भारतीय कल्पनाशक्तीचा विलोभनीय आविष्कार आहे.

वसंत आबाजी डहाके ह्या मराठी भाषेतील लेखक व कवीने आपल्या 'यात्रा-अंतर्यात्रा' ह्या पुस्तकात त्यांच्या हिमालयातील केदारनाथ, बदरीनाथ, यमुनोत्री व गंगोत्री ह्या 'छोटा चारधाम' यात्रेविषयीचे (किंबहुना सफरीविषयी) छान अनुभव लिहिले आहेत. वाचकांनी वसंत आबाजी डहाके लिखित 'यात्रा-अंतर्यात्रा' हे पुस्तक जरूर वाचावे. यात त्यांनी पांडवांच्या बदरीनाथ येथून झालेल्या स्वर्गारोहणाविषयी देखील लिहिले आहे. तसे पाहता बदरीनाथ हे भगवान विष्णूशी निगडित असलेले हिमालयातील स्थान आहे. येथेच अलकनंदा नदीचादेखील उगम आहे. परंतु अनेक शिवभक्त व शैवपंथीय 'बदरीनाथ हे भगवान शिवाशी देखील संबंधित असलेले पवित्र ठिकाण होय' असे मानतात. त्यामुळे पांडवांसारख्या योध्यांना देखील आपले पापक्षालन करण्यासाठी व स्वर्गारोहणासाठी भगवान शिवाला शरण यावे लागले यावरून भगवान शिवाचे महत्त्व अधोरेखीत होते. तसेच भगवान शिवाच्या हिंदू धर्म व एकंदरीतच समाज मनातील अढळ स्थानाची प्रचीती येते. संपूर्ण भारतवर्षात गेल्या दोन हजार वर्षांहूनही जास्त काळ भगवान शिवाची पूजा केली जाते. ही पूजा अनेकदा वा

साधारणतः शिवलिंग स्वरूपातच होते. भगवान शिव वा महादेवाचा उल्लेख विविध स्वरूपात वेद (ऋग्वेद व यजुर्वेद), पुराणे व महाकाव्यांत (रामायण व महाभारत) व इतरही ग्रंथ व साहित्यामध्ये पदोपदी येतो. यावरून महादेवाचे भारतीय समाज व हिंदू धर्मातील महत्त्व अधोरेखीत होते. दिनांक १२ ऑगस्ट २०१८ पासून हिंदू पंचांगाप्रमाणे (शालीवाहन शके) हिंदू धर्मातील अतिशय पवित्र अशा श्रावण मासाची सुरुवात झालेली आहे. हा महिना ऊन-पावसाच्या खेळामुळे आपणास खूप भावतो. श्रावणसरी (पावसाच्या) मनाला प्रसन्न करून जातात. म्हणनूच की काय मराठी भाषेतील अतिशय लोकप्रिय असे निसर्गकवी म्हणजेच त्र्यंबक बापूजी ठोंबरे ऊर्फ बालकवी यांनी 'श्रावणमासी हर्ष मानसी' ही कविता रचली असावी. असो. तर अतिशय पवित्र अशा श्रावण मासात तर भक्तगण भगवान शिवाची फार मनोभावे पूजा-अर्चा व आराधना करत असतात. ह्या श्रावण मासात दिनांक १३ सप्टेंबर २०१८ रोजी (इंग्रजी कॅलेंडरनुसार) गणेश चतुर्थी देखील आहे. गणेश हा भगवान शिव व माता पार्वतीचा पुत्र व विद्येचे व ज्ञानाचे प्रतीक मानला जातो. साधारणतः ह्याच कालावधीत जपानमधील क्योटो-सँगो विद्यापीठातील जपानी विद्यार्थ्यांचा चमूदेखील आपल्या विद्या प्रसारक मंडळ संचलित ठाण्यातील विविध महाविद्यालयांना भेट देत असतो. ही जपानी विद्यार्थ्यांची भारतभेट म्हणजे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकरांचा आपल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना व प्राध्यापक मंडळींना प्रगत राष्ट्रांतील शिक्षण पद्धतीविषयीची माहिती देण्याचा व सांस्कृतीक आदान-प्रदान घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी डॉ. विजय बेडेकरांचे शतशः धन्यवाद. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, भक्तगण श्रावण मासात भगवान शिवाची मनोभावे पूजा करतात. प्रत्येक श्रावणी सोमवारी तर अनेक शिवमंदिरांमध्ये खूप गर्दी असते. अशा ह्या पवित्र श्रावण मासात माझ्या हातून हा लेख लिहून झाला ही मी माझ्यावर भगवान शिवाचीच कृपादृष्टी आहे असे मानतो. भगवान शिव वा महादेवाने संपूर्ण भारतवर्षाचे व सर्व भारतीयांचे चिरंतर पालनपोषण व रक्षण करावे अशी भगवान शिवाला प्रार्थना करून 'ॐ नमः शिवाय' ह्या पापाचा नाश करून ज्ञान व बुद्धी देणाऱ्या चिरंतर मंत्राने वा वचनाने ह्या लेखाचा शेवट करतो.

**संदर्भ :**


- इंडिया - अ सेक्रेड जॉग्रफी (इंग्रजी): डायना एल. येक. (इंग्रजी) सुधारीत आवृत्ती
- गॅझेअिअर ऑफ इंडिया - महाराष्ट्र स्टेट, ठाणे डिस्ट्रीक्ट
- भारतीय संस्कृती कोश - खंड ९ - संपादक पं. महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक - तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर
- भक्तिकोश तृतीय खंड - भारतीय संप्रदाय विद्यावायस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर
- शिवलिंग (इंग्रजी) : एन्. के. सिंग
- सेव्हन सिक्रेटस् ऑफ शिवा : देवदत्त पट्टनायक
- शिवा टू शंकर : देवदत्त पट्टनायक
- विश्वकोश-खंड १७ : प्रमुख संपादक : विजया वाड
- असे घडले ठाणे - डॉ. दाऊद दळवी
- देवदर्शन जिल्हा ठाणे : मोरेश्वर के. कुंटे व सौ. विजया कुंटे



**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

Email :subhashinscotland@gmail.com


●●●

# दिवाळी दिव्यांचा उत्सव

*दिवाळी म्हणजे तेजाने न्हाऊन निघणं, दिवाळी म्हणजे नात्यांचा उत्सव. दिवाळी हा भारतीय संस्कृतीत एक प्रकाशपर्व म्हणून साजरं केलं जातं. दिवाळीच्या मागची तात्विक पृष्ठभूमी विशद करणारा डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी यांचा लेख- संपादक*

दिवाळी हा नुसता सण नसून स्नेहसंमेलन आहे. या क्षणाला परिवारातील सर्वजण एकत्र येतात. मित्र एकमेकांना भेटतात. त्यामुळे नातेसंबंध जपले जातात. सर्व एकत्र येऊन साजरा करत असल्यामुळे हा उत्सव आहे.

वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज आणि पाच ते सहा दिवसांचा हा उत्सव असतो.

वसुबारस या दिवशी गाय-वासराची पूजा केली जाते. संतती प्राप्ती हे पूजन केले जाते. आपल्या संस्कृतीत गायीशी स्वजनासारखा संबंध जोडला आहे. म्हणून आपण जेवण्यापूर्वी गोग्रास देण्याची पद्धत आहे.

गाईचे दूध अमृताप्रमाणे आहे. ते पौष्टीक तर आहेच पण ते आपल्या ज्ञानेंद्रियाची शक्ती वाढवणारे आहे. मेध्य म्हणजे बुद्धी वाढवणारे आहे. तसेच त्वचेची कांती वाढवते, मन शांत ठेवते.

तूप पचनशक्ती वाढवते. शरीराचे बल वाढवते, पर्यायाने आरोग्य उत्तम राहते.

गोमूत्र अनेक रोगांवर उपयोगी आहे. जसे लठ्ठपणा, त्वचारोग, बद्धकोष्ठता.

गोमथ म्हणजे शेण. याचा उपयोग औषधांमध्ये केला जातो. पण शेतात खत म्हणून उपयोगी आहे.

अशाप्रकारे गाईपासून मिळणाऱ्या प्रत्येक घटकांचा उपयोग आपल्या जीवनात होतो म्हणून तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच हा सण साजरा करण्याची पद्धत आपल्या पूर्वजांनी सुरू केली असावी असे वाटते.

**धनत्रयोदशी** : आश्विन वद्य त्रयोदशी. संध्याकाळी थोडी कणीक घेऊन त्यात तेल व हळद घालून एक दिवा करतात. तो दिवा अंगणात दक्षिणेकडे तोंड करून ठेवतात. यमाची अवकृपा होऊ नये म्हणून अशा प्रकारे यमदीप दान करावे.

व्यापारी लोक धनतेरस मोठ्या प्रमाणात साजरी करतात. धनाची पूजा करतात आणि धने आणि गूळ यांचा नैवेद्य दाखविला जातो. लाह्या आणि बत्तासेही प्रसाद म्हणून दिले जातात.

याच दिवशी सर्व धन्वंतरीचे पूजन करतात. भगवान धन्वंतरी म्हणजे डॉक्टरांचे डॉक्टर. आजच्या दिवशीच समुद्र मंथनातून धन्वंतरी या आरोग्य रत्नाची प्राप्ती झाली. म्हणून सर्व वैद्य 'धन्वंतरी जयंती' साजरी करतात. या दिवसांचे निमित्त साधून आयुष मंत्रालय भारत सरकार यांना धन्वंतरी जयंती ही राष्ट्रीय आयुर्वेद दिवस म्हणून साजरा करण्याचे निर्देशित केले आहे. तसेच या वर्षीच्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनाचे घोषवाक्य खालीलप्रमाणे निश्चित केले आहे.

**Ayurved for Public Health आयुर्वेद - जन आरोग्यासाठी**

भगवान धन्वंतरी हा विष्णुचा अवतार आहे. ही देवता घननीळ वर्णाची असून त्यांनी शंख, चक्र, जलौका, अमृतकुंभ धारण केले आहेत. चक्र हे आयुध रोग नाशाचे प्रतीक आहे. शंखध्वनी हा भारतीयांनी पवित्र मानला आहे. वातावरण शुद्धी, मानसिक स्थैर्य व शांततेसाठी हा नाद उपयुक्त आहे. आयुर्वेदात अनेक रोगांमध्ये शंख भस्माचा उपयोग केला जातो.

जलौका म्हणजेच जळ ही रक्तमोक्षण व पर्यायाने पंचकर्माचे प्रतिनिधित्व करते.

अमृतकुंभ हे निरोगी दीर्घायुष्याचे प्रतीक.

**नरक चतुर्दशी** – नरक चतुर्दशीची कथा अशी आहे की, प्राचीन काळी नरकासूर नावाचा बलाढ्य राजा होता. त्याने देशोदेशींच्या सुंदर स्त्रियांना आपल्या बंदिशाळेत ठेवले होते. श्रीकृष्णाने या राक्षसाचा वध केला आणि सर्व स्त्रियांना मुक्त केले. या दिवसापासून ही तिथी नरक चतुर्दशी या नावाने ओळखली जाते. नकासुराच्या त्रासातून मुक्त झालेल्या लोकांनी उत्सव साजरा केला. अंधाऱ्या रात्री दिवे लावून त्यांनी तिला प्रकाशित केले.

या दिवशी सूर्योदयापूर्वी उठावे. अंगाला सुगंधी तेल आणि उटणे लावून स्नान करावे. स्नान करणाऱ्याचे औक्षण करावे. त्यालाच 'अभ्यंग स्नान' असे म्हणतात.

अभ्यंगामुळे शरीरातील सर्व स्नायू आणि धातूंना बल मिळते. सतत धावपळ, ताणतणाव यामुळे आलेला थकवा कमी होतो आणि आपला स्टॅमिना वाढतो. वर्ण आणि कांती सुधारते. त्वचा तुकतुकीत होते. सुरकुत्या पडत नाहीत. शिरोभ्यंग म्हणजे डोक्याला तेल लावणे. यामुळे डोके दुखत नाही. केस गळणे, पांढरे होणे, झोप न लागणे या तक्रारी बंद होतात.

**पादाभ्यंग** – डोळ्यांची शक्ती वाढते. झोप शांत लागते. अभ्यंग नित्यं आचरेत्. म्हणून फक्त दिवाळीत न करता अभ्यंग नियमित करावे .

**उदवर्तन** – उटणे लावणे. या उटण्यात तीळ, नागरमोथा, कर्पूर काचरी, गव्हलाकचोरा, संत्रासाल चूर्ण ही सर्व सुगंधी द्रव्ये असतात. उदवर्तनामुळे रक्ताभिसरण सुरळीत होते. त्वचा कांतीमान होते. लठ्ठपणा कमी होतो. कफविकार, त्वचाविकार दूर होतात. शरीर निरोगी आणि सुदृढ होते. म्हणून आपण नियमित उदवर्तन आणि अभ्यंग स्नान केले पाहिजे.

**लक्ष्मी पूजन** – या दिवशी नवीन केरसुणीची पूजा करतात. पुरातन काळी बळी राजाने सर्व देवांना आणि लक्ष्मीला कोंडून ठेवले. त्यावेळी विष्णूने वामनाचे रूप घेऊन त्रिपाद भूमीचे दान मागितले व लक्ष्मीसह सर्व देवतांची सुटका केली.

या दिवशी लक्ष्मीची तसेच सोने, चांदी, रुपया यांची पूजा करावी. धने, गूळ, लाह्या, बत्तासे यांचा प्रसाद करावा. धने पित्तशामक, सुगंधी आणि रुची वाढवणारे असतात. पचन सुलभ होते. शरद ऋतू हा काळ पित्तप्रकोपाचा काळ असतो. अनेक पित्तविकार वाढलेले असतात. तेव्हा धने शरीरातील उष्णता कमी करून पित्त कमी करते. धन्यामुळे लघवीच्या तक्रारीही दूर होतात. गुळामुळे पित्ताचे शमन होते.

**बलिप्रतिपदा** – हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त मानला जातो. बलिराजाचे दातृत्व पाहून वामनाने त्याला वर दिला की, तुझ्यासारख्या अलौकिक दात्याची सेवा करण्यासाठी मी द्वारपाल होईन. म्हणून बलिच्या स्मरणासाठी बलिप्रतिपदा साजरी केली जाते. यादिवशी विक्रम संवत सुरू होते. व्यापारी लोक नवीन वर्षारंभ मानतात. त्यांचा वह्या पूजनाचा हा दिवस संपूर्ण वर्षाचा आढावा घेण्याचा हा दिवस. ह्या दिवशी माणसाने जीवनाचाही आढावा घेतला पाहिजे. राग, द्वेष, इर्ष्या, मत्सर, जीवनातील कटुता दूर करून प्रेम, श्रद्धा, उत्साह वाढावा ह्याकडे लक्ष द्यावे. चांगले संकल्प करावेत. आपण आनंदी राहावे व इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न करावा. जेणे करून आपले मानसिक आरोग्यही चांगले राहील.

**भाऊबीज – यमद्वितीया** – यमराजाची बहीण यमुना हिने या दिवशी भावास जेवावयास बोलावले म्हणून भाऊबीज हा सण साजरा करतात.

या दिवशी बहिणीने भावाला अभ्यंग स्नान घालून ताटाभोवती रांगोळी काढून भोजनासाठी गोड पक्वान्न करावे. सायंकाळी भावाला औक्षण करावे. भावाबहिणीचे प्रेम यातून व्यक्त होते.

(पृष्ठ क्र. २२ वर)

जो संपत्ती आणि अधिकार मिळविण्यात अपयशी होतो, त्याचा प्रामाणिकपणा आणि त्याचे शौर्य फार दिवस टिकत नाही. – सॅम्युअल जॉन्सन

# आपला भाषिक लोच्या

*मराठी भाषा बोलत असताना ती १२ मैलावर बदलते असे म्हणतात. मराठी व इंग्रजी या दोन भाषा मुळे आपल्या रोजच्या बोलण्यात होणाऱ्या भाषिक गडबडी बद्दल प्रा अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी यांचा लेख - संपादक*

प्रत्येक १२ मैलांवर भाषा बदलते आणि लोकांची बोलीभाषा, लकब, हेल सगळं बदलत जाते असं निरीक्षण पु. ल. देशपांडे यांनी नोंदवलं आहे. पु. लं. चं हे निरीक्षण आज २०१८ सालात पडताळून बघायचं ठरवलं तर फारच वेगळी निरीक्षणे समोर येतील.

फक्त महाराष्ट्रापुरता विचार केला तर, पुणेरी प्रमाण मराठी, कोकण प्रांतातली कोकणी, विदर्भाची वऱ्हाडी, खानदेशी, मराठवाडी मराठी आणि मुंबईची किंचित लवचिक आणि उत्तर भारतीय हिंदीकडे झुकणारी मराठी असा भाषिक मसाला दिसतो. पण, जागतिकीकरणाचा रेटा, पुणे-मुंबई सारख्या शहरांमध्ये झालेल्या आंतरराज्यीय स्थलांतरामुळे असणारी बहुसांस्कृतिकता या घटकांमुळे महाराष्ट्रात असणाऱ्या भाषिक सीमारेषा आता पुसट झाल्या असून मराठीचा मराठी बाज / मराठी बाणा हा आता सामाजिक-राजकारणाचा भाग झाला आहे.

ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीचा परिपूर्ण अंगीकार केलेल्या मराठीजनांनी 'वाघिणीचे दूध' रिचवून पचवले सुद्धा आहे. पण त्याचवेळी Fluently (पक्षी फाड फाड) इंग्रजी बोलणारी आपली आजची पिढी त्याच तळमळीने मराठी बोलते का? हा आत्मपरीक्षणाचा विषय आहे. युरोपात स्थायिक झालेल्या मराठी कुटुंबांच्या मराठीचा विचार एक वेळ सोडून दिला तरी पुणे-मुंबई, औरंगाबाद, नाशिक, पनवेल, नागपूर या मराठी भाषिक पट्ट्यात मराठीची सद्यस्थिती आणि भविष्य याचा विचार कोण करणार? हिंदी आणि इंग्रजी भाषांचा बोली मराठीवर पडलेला प्रभाव आणि शिक्षण-साहित्य या क्षेत्रांतून दर्जेदार मराठीची होत असलेली पीछेहाट हे आजच्या मराठीचे वास्तव. हे वास्तव समजून घ्यायला थोडंसं वेगाने फोफावत चाललेल्या फ्लॅट संस्कृतीत डोकावून बघू या.

स्वयंपाक करणे हा नित्याचा स्त्रीसुलभ वाक्प्रचार आता 'जेवण बनवणे' असा रूपांतरित झाला आहे. तसंच, घरात हरवलेली एखादी वस्तू आता 'सापडत' नसते तर ती 'मिळत' नसते. फार काम, लोकल ट्रेनमध्ये लोकांना 'चढता येत नाही' च्या ऐवजी 'चढायला मिळत नसतं'. शेजारच्या कुटुंबाची ओळख 'आपल्या बाजूला अभ्यंकर करून आहेत ना...' अशा पद्धतीने करून दिली जाते. सणासुदीला आपण सणसमारंभ साजरे करण्याऐवजी 'मनवत' असतो. 'बनवण्याच्या' आणि 'मनवण्याच्या' अनेक हास्यापद प्रकाराला आपण सगळेच कधी ना कधी सामोरे जात असतो. अस्सल मराठी भाषकाला हे भाषिक प्रसाद लक्षात येतात. परंतु दुर्दैवाने आपण त्याबद्दल बोलत नाही. अजून एक 'बोलणे' आणि 'म्हणणे' या क्रियापदांचा योगय वापर करण्याची सारासार विचारशक्ती बहुतांश मराठी भाषक गमावून बसले आहे. बोलीभाषा आणि प्रमाणभाषा या भाषिक सीमारेषा कितपत पाळायच्या हा चर्चेचा मुद्दा असू शकतो. परंतु परप्रांतीय भाषांच्या प्रभावामुळे (आक्रमणामुळे नाही) मराठीचे मूळ स्वरूप हरवत चालले असेल तर मात्र काळजी वाटण्याचे कारण आहे. महाराष्ट्रात मराठीचे वर्तमान आणि भविष्य काय? या विषयावर समाज, राजकारणी, सरकार, विचारवंत, प्रसारमाध्यमे या प्रत्येक घटकाची भूमिका यावर बरेच चिंतन आजवर झालेले आहे. पण मराठीच्या संवर्धनासाठी भाषिक अभिनिवेश व भाषिक अस्मिता बाजूला ठेवून काय ठोस 'कृती' करता येईल याबद्दल पूर्ण ठणठणाट आहे.

ज्याला कधी अपयश येत नाही, तो कधीही श्रीमंत होणार नाही. - सी. एच. स्पर्जन

स्वतंत्र भारतात जन्मलेल्या पिढ्यांनी भाषिक, प्रांतिक बंधने झुगारून इंग्रजीच्या मदतीने आर्थिक विकास साधला. परंतु या प्रक्रियेत भाषा आणि संस्कृतीवर झालेले परिणाम दुर्लक्षिले गेले. याचाच परिणाम म्हणून आज आपण पाहतोय तो – 'भाषिक लोच्या'. हिंदी कवी कुमार विश्वास म्हणतात, 'भाषा का बीज बचेगा तो संस्कृती का पेड रहेगा।'

हा सगळा विचार केल्यावर प्रश्नांचं वादळ घोंघावायला लागतं. काय करावं मराठी वाचवायला? सभा-संमेलनं, परिषदा, भाषिक मेळावे, भूमिपुत्र आणि उपरे यांच्यातले वाद, परप्रांतियांवर आक्रमण-अत्याचार? या सगळ्या गोष्टी आजही होतातच की. पण आपल्या मातृभाषेचा वटवृक्ष जपायचा असेल तर अशा काही गोष्टी करता येतील.

१. इंग्रजीतील दर्जेदार अकादमिक आणि इतर साहित्य सातत्याने भाषांतरित करून मराठीत आणणे.
२. यू-ट्यूब, किंग्ल, फेसबुक, टिव्टर या समाज माध्यमांवर झळकणाऱ्या मराठीचा दर्जा तपासणे व कमअस्सल दर्जाचे मराठी सुधारणे.
३. समाज माध्यमांचाच वापर करून दर्जेदार मराठी साहित्य नव्या पिढीपर्यंत पोचवणे.
४. मनोरंजन क्षेत्रात (गाणी-सिनेमा-नाटके) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून मराठीचा विस्तार करणे.

या उपायांच्या व्यतिरिक्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक मराठी भाषकाने आपल्या परिसरात, कुटुंबात, शेजारी-पाजारी मराठीत बोलण्याचा आग्रह धरणे. असे केले नाही, तर पुढच्या पिढ्यांकडून योग्य दर्जाच्या बोलीभाषोची अपेक्षा करणे मूर्खपणाचे ठरेल.

प्रत्येक १२ मैलांवर लकब आणि हेल एवढंच बदलणारी मायमराठी जर तिचं स्वत्व आणि स्वरूपच गमावून बसली तर आपल्या तथाकथित मराठी बाण्याचे काय होणार? मग येणाऱ्या पिढ्या आपल्याला नक्की विचारतील, 'कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा आणि आमची मराठी?'

**– अपर्णा कुलकर्णी**
सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई
भ्रमणध्वनी : ७७६८०२७६५८

●●●

(पृष्ठ क्र. २० वरून – **दिवाळी दिव्यांचा उत्सव**)

दिवाळीच्या दिवशी कनक म्हणजे लक्ष्मीकडे पाहण्याची पूज्य दृष्टी व भाऊबीजेच्या दिवशी समस्त स्त्रीवर्गाकडे आई किंवा बहीण ह्या दृष्टीने पाहण्याची शिकवण या सणामधून दिली जाते. स्त्री ही भोग्य नाही तशीच त्याज्यही नाही. ती पूज्य आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपण दिवाळीच्या प्रत्येक दिवशी औक्षण करतो.

औक्षणाचा अर्थ असा की, आपण ज्यांचे औक्षण करतो त्याच्या जीवनातला अंधार कमी होवो, त्याचे जीवन मंगल होवो, त्याचे आरोग्य चांगले असावे, त्याचे कल्याण व्हावे, ही मंगल भावना असते. तो औक्षणाचा दिवा त्याच्या बाजूला तेजाचे वलय निर्माण करतो. त्याला शांत बनवून अंतर्मुख करतो आणि आत्मज्योतीची कल्पना देतो.

दिवाळीत रोज पणत्या लावल्या जातात. त्या पणतीची शिकवण अशी असते की, 'भले तू लहान असशील, तुझी किंमत कमी असली तरी जळण्याची तयारी ठेव. हिंमत दाखव. मग तूही प्रकाश देऊ शकशील. तूच ते करू शकशील', ही प्रेरणा देणाऱ्या पणतीला आपण नमस्कार केलाच पाहिजे.

असा हा दीपोत्सव आपल्या जीवनांत आरोग्य, आनंद, वैभव, प्रेम यांचा प्रकाश निर्माण करणारा आहे.

**– डॉ. शैलजा धर्माधिकारी**

●●●

# संकेत देशपांडे - व्ही.पी.एम्च्या माळेतील निखळलेला मोती

*विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनचा माजी विद्यार्थी संकेत देशपांडे याचे १० ऑगस्ट २०१८ रोजी आकस्मात निधन झाले. त्याच्या यशस्वी वाटचालीचा आढावा या लेखात दिला आहे - संपादक*

९ ऑगस्टला Instrumentation Department च्या Alumni चा एक whatsapp group form केला. ज्यात सगळे नवीन-जुने विद्याथी- लगेच add व्हायला लागले आणि २ दिवसातच group full (256 members) झाला. त्यात 'I am Sanket Deshpande-2003 passout' हा message आला. अगदी आनंदाने पाठवलेला, excitement दिसत होती.

पण १० ऑगस्टला कुणीतरी group वर 'संकेतला देवाज्ञा झाली' असे टाकले. माझ्या सकट कुणाचाच त्यावर विश्वास बसला नाही. आदल्या दिवशी जो मुलगा इतका excited होऊन group join करतो, तो गेला कसा?



१५ वर्षांनी भेटलेला संकेत २ दिवसातच हरवला.

संकेतच्या शोकसभेत जायची माझ्यावर दुर्दैवी वेळ आली. त्याचा दाणगा मित्र परिवार, त्याच्यावर असलेलं त्याच्या मित्रांचं प्रेम, त्यांच्या भावनांना अश्रुंनी करून दिलेली वाट, हे सगळं मी तिथे अनुभवलं. अभिनय कट्ट्यांचे त्याचे सर श्री. किरण नकटी यांनी वाहिलेली श्रद्धांजली आणि संकेतसाठी काहीतरी करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली आणि त्यानुसार काही दिवसांनी त्यांनी संकेतच्या नावावर library सुरू केली. ह्या धक्क्यातून सावरणं सगळ्यांनाच कठीण जात होतं. संकेतच्या अभिनयाची झलक म्हणून त्याच्या मित्राने तयार केलेले presentation कुणाच्याही मनाला चटके लावून जाईल असेच होते.

७ फेब्रुवारी १९८३ साली मुंबईत खार ह्या ठिकाणी देशपांडे कुटुंबात जन्म झाला. शालेय शिक्षण सरस्वतीत घेऊन, २००३ साली Diploma Instrumentation होऊन संकेत देशपांडे बाहेर पडला आणि नंतर भारती विद्यापीठ येथून त्याने B.E. (Instrumentation) ही पदवी मिळवली. नंतर ६ महिने control Valve च्या 'Samson' कंपनीत त्याने नोकरी पण केली. दरम्यान त्याने आपल्याला अभिनय क्षेत्रात रस असल्याचे घरी सांगितले आणि घरच्यांची परवानगी मिळताच त्याने सौ. स्मिता तळवळकरांच्या 'अस्मिता चित्र' मधून अभिनयाचा course केला. प्रत्येक course च्या शेवटी विद्यार्थ्यांना आपली कला सादर करावयाची असते आणि इथेच सौ. स्मिता तळवळकरांनी संकेत मधल्या कलाकाराला ओळखले.

ठाण्यातल्या 'अभिनय कट्ट्यात' संकेत अगदी सुरुवातीपासून active होता. फक्त अभिनय नव्हे तर लिखाणही संकेत उत्तम करायचा. त्याने ३ नाटकं लिहिली. त्यातल्या २ नाटकांना censor certificate पण प्राप्त झाले. नुकतेच १० आणि १५ मे ला संजय मोनेंचं 'हम तो तेरे आशिक है' चे २ प्रयोग झाले, ज्यात त्याने सूत्रधाराची महत्त्वाची भूमिका बजावली होती. TMC च्या कर्मचारी संघासाठी, Rotary Club द्वारा आयोजित 'बाप गेला रे बाप' चा यशस्वी प्रयोग केला. ह्या शिवाय 'उंच माझा झोका', 'Crime Patrol', 'घाडगे पाटील अन् सून' आणि 'अर्धांगिनी' सारख्या लोकप्रिय मालिकांमधे काम केलं. अनिल कपूरच्या 'फन्ने खान' चित्रपटात त्याला छोटी

भूमिका मिळाली. छोटी असली तरी त्याच्यातल्या कलाकाराला अनिल कपूरने ओळखले आणि भरभरून दाद दिली. ऋतिक रोशन बरोबर चित्रपट, महेन्द्र धोनी बरोबर जाहिरात, हे त्याचे आगामी Projects अजून release व्हायचे आहेत.

राज्यस्तरीय द्विपात्री एकांकिका स्पर्धा 'देव रजेवर गेले' च्या प्रयोगाला रसिकांनी मनमुराद दाद दिली. २ वर्षे-२०१३ आणि २०१५ साली संकेतला राज्य नाट्य परिषदेची बक्षीसं मिळाली. २०१६ साली ठाण्यात झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनात संकेतने निवेदन केले होते अणि त्यासाठी मासुंदा तलावात उभारण्यात आलेला तरंगता stage manage करण्यात संकेतचा मोठा वाटा होता. २००६ साली B.E. करतानाच संकेतने Insurance ची परीक्षा दिली आणि ठाण्यात पहिला क्रमांक पटकावला. त्याने Bajaj Allianz, Mutual Fund ची agency घेतली आणि General आणि Life दोन्ही Insurance ची कामे हाताळू लागला. थोडक्यात काय तर प्रत्येक संधीचं संकेतने सोनं केलं. इतक्या लहान वयात इतक्या विविध क्षेत्रात मजल मारूनही संकेत अगदी विनम्र होता. मोठ्यांचा आदर करणे, सगळ्यांना सामावून घेणे, सगळ्यांना सर्वतोपरी मदत करणे हे सगळे गुण त्याच्यात उपजतच होते. म्हणून त्याचा मित्रपरिवार त्याच्याच भाषेत 'शेवटचा सल्ला' संकेतचाच घ्यायचे. तिन्ही Hindi / Marathi / English भाषांवर त्याचं प्रभुत्व होतं.

'बाळाचे पाय पाळण्यातच दिसतात' ह्या उक्तिप्रमाणे अगदी ५--६ वर्षाचा असताना संकेतने धोतर, पंचा आणि गंध लावून आपल्यामधल्या वेगळेपणाची hint दिली. वयाच्या १० व्या वर्षी गाडगीळांची दुर्दम्य कादंबरी वाचली. दाणगा वाचक असल्यामुळे, संकेत वेगवेगळ्या विषयांवर थोर व्यक्तिंबरोबर discussions करायचा. - मग तो विषय कोणताही असो त्याचे B.E. चे Professor, किंवा राजकारण की स्वतंत्र सेनानी. २००९ साली शिवाजी महाराजांवर श्री. सदानंद मोरे ह्यांचे लोकप्रभा मधे आलेले लेख आवडीने जतन करून त्याच्यावर प्रतिक्रिया द्यायचा, ज्याची दखल श्री. मोरेंनी घेतली आणि त्याला उत्तर दिलं असं ह्या दोघांमधले तर्क, संवाद / प्रतिक्रिया हे ४--५ वेळा झाल्यावर लोकप्रभाने ते थांबवले. पण personally ते चालूच राहिले. ह्याच्यावरून लक्षात येईल की, संकेतचा ह्या विषयावर सखोल अभ्यास होता. शिवाजी महाराजच नाही तर संभाजी महाराज, महाभारत, रामायण, विष्णुदास भावेंची नाटके ही सगळी संकेतने वयाच्या लहानपणापासूनच वाचली आणि आकलन केली. संकेतच्या आईच्या शब्दात सावरकरांवर संकेतचं नितांत प्रेम आणि भक्ती होती. लोकमान्य टिळक, भगत सिंह इ. क्रांतिकारांबदद्ल त्याला आदर होता.

थोर लोकांच्या सहवासात रहायला संकेतला आवडत असे. पण कधीही कुणाला कमी लेखून कुणाचा अपमान त्याने कधी केला नाही. इतिहास हा त्याचा आवडता विषय. -चाणक्य, चंद्रगुप्त मौर्य आणि मुगलांच्या आधीचा इतिहास सुद्धा त्याला तोंडपाठ होता.

आपल्या ज्ञानाचं भांडवल करून लोकांना यथाशक्ती मदत करायचा. नंतर वडिलांच्या सल्ल्याप्रमाणे संकेतने Law करायचे मनावर घेतले आणि ४ ऑगस्टला तो आपल्याच विधी महाविद्यालयामधून LLB झाला. वडिलांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी पुढची स्वप्न रंगवायला सुरुवात केली. त्यांच्याकडे आलेलं काम आणि काही cases पुढे आपला मुलगा बघेल म्हणून रेंगाळत ठेवली. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते आणि १० ऑगस्टला संकेतवर काळाने डाव साधला. हॉस्पिटलमधे असतानाच हृदयाच्या तीव्र झटक्याने त्याचे निधन झाले. अकस्मात झालेल्या ह्या आघातातून सावरण्यासाठी त्याच्या कुटुंबीयांना देव शक्ती देवो आणि संकेतच्या आत्म्याला चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**- प्रा. सौ. व्ही. ए. जोशी**
विभाग प्रमुख, इंस्ट्रुमेंटेशन इंजीनियरिंग,
वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

### स्वच्छता सप्ताह

दि. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत प्राथमिक विभागाच्यावतीने दिलेल्या उपक्रमांची अमलबजावणी व त्याचे नियोजन करण्यात आले.

महात्मा गांधीजी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त मुलांना त्यांच्या कार्याची माहिती व्हावी याच हेतूने घेतलेल्या उपक्रमाच्या त्यांच्या कार्याचा संदर्भ घेतला गेला. या सर्व उपक्रमांमध्ये इ.१ली ते ४ थीच्या सर्व मुलांना सहभागी करून घेतले.

स्वच्छता दौड, शालेय परिसर स्वच्छता, स्वच्छता शपथ, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, नाटक स्पर्धा, स्वच्छता प्रभात फेरी, वृक्षारोपण इ. विविध उपक्रमांनी हा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

### श्री गणेशोत्सव

बुधवार दि. १२ सप्टेंबर २०१८ रोजी श्री गणेशाचे आगमन आमच्या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहाने झाले.

गुरुवार १३ सप्टेंबर रोजी एका बालभक्ताकरवी श्री गजाननाची यथासांग पूजा करण्यात आली. सर्व विभागातले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

शुक्रवार १४ सप्टेंबर रोजी बाप्पाला आनंदाने निरोप देण्यात आला.

### शारदीय नवरात्रोत्सव

आमच्या विद्या मंदिरातही प्रतिवर्षाप्रमाणे अतिशय आनंदाने उत्साहाच्या वातावरणात शारदोत्सव साजरा केला गेला.

आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी या हेतूनेच पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या हत्तीच्या चित्राभोवती फेर धरून भोंडल्याची गाणी म्हटली गेली. अशा रीतीने भोंडल्याचे वैशिष्ट्य दाखवता आले.

खिरापत वाटून त्याची सांगता झाली. विजयादशमीनिमित्त विद्यार्थ्यांनी पाटीपूजन केले. सरस्वतीची मनोभावे पूजा केली. फुलांची माळ बनवण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांकडून घेऊन वर्ग सजावटही करण्यात आले.

### वाचन प्रेरणा दिन

सोमवार दि. १५ ऑक्टोबर २०१८ रोजी इ.१ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांसह भारतरत्न, थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. तसेच त्यांच्याकडून विविध पुस्तकांचे वाचन करून घेतले.

### शैक्षणिक सहल

बुधवार दि. २४ ऑक्टोबर रोजी इ.१ली ते ४ थीची शैक्षणिक सहल आनंदसागर, अंबरनाथ येथे गेली.

विद्यार्थ्यांना पारले फॅक्टरीत तयार होणाऱ्या विविध बिस्किटे, गोळ्या यांची फिल्म दाखवली. तसेच बिस्किटे तयार होण्यापासून पॅकींग करण्यापर्यंतचे प्रात्यक्षिक दाखविले.

आनंदसागर येथे असणाऱ्या विविध झाडांची माहिती विद्यार्थ्यांना झाली. विविध खेळांद्वारे विद्यार्थ्यांचे मनोरंजनही झाले.

मुख्याध्यापिका व सर्व शिक्षिका यांनी नियोजनबद्ध शिस्तिने सहल आनंदात पार पाडली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

• दि. २ ऑक्टोबर २०१८ रोजी म. गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

• मॉक, ड्रिल ठाणे तर्फे प्रत्यक्षात अपघात झाल्यानंतर मुलांनी सुरक्षित जागी कमी वेळेत कसे पोहचावे याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. यामध्ये प्रथम शाळेतील प्रयोग शाळेत आग लागल्याची बातमी सांगण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्षात तीन मिनिटात अखंड शाळा खाली करण्यात आली. फोन केल्यानंतर प्रत्यक्ष सात मिनिटात अग्निशमन दलाची गाडी आली व प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात झाली. पहिल्या मजल्यावरील आग विझवून, आग लागल्यानंतर ती कशी विझवावी याचे प्रशिक्षण सर्व मुलांसमोर मैदानात देण्यात आले. यामुळे अपघात झाल्यावर त्यावर नियंत्रण कसे आणावे याची माहिति विद्यार्थ्यांना झाली.

• दि. ४ ऑक्टो. रोजी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'मराठी भाषा लेखन' कार्यशळा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना उपयोजित लेखन म्हणजेच पत्रलेखन, कथा-लेखन, निबंधलेखन याची वाटणारी भीती घालवणे व त्यातच चांगले गुण मिळू शकतात याची हमी देणे हा उद्देश होता. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले ते निवेदक, लेखक तसेच व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट श्रीरंग खटावकर आणि शिवसमर्थ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा परचुरे यांचे.

• दरवर्षी मराठी विज्ञान परिषदेमार्फत राजयस्तरीय 'विज्ञान एकांकिका' स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धेत मुंबई विभागीय प्राथमिक फेरी दि. १२/१०/१८ रोजी दादर येथे पार पडली. आपल्या शाळेतील इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी 'सर मायकेल फॅरेडे' यांच्या जीवन परिचयवर आधारित एकांकिका सादर झाल्या. यापैकी आपल्या शाळेची गुणानुक्रमे विभागीय पारितोषिकासाठी प्रथम क्रमांकाने निवड झाली व अंतिम फेरीसाठी प्रवेश मिळाला आहे.

• राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २०१८ अंतर्गत शनिवार दि. १३/१०/१८ रोजी जिल्हा पातळीवरील परिषद पार पडली. या जिल्हा पातळीवर ७ विज्ञान प्रकल्प सादर करण्यात आले पैकी ५ प्रकल्पांची Pre-State level साठी निवड झाली. सरील सर्व प्रकल्पांना सौ. धोत्रे व सौ. सोनावणे यांचे मार्गदर्शन लाभले.

• शारदोत्सवानिमित्त दि. १६/१०/१८ रोजी इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी पणती सजावट इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी कलश सजावट तर इ. ९ वी १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मेहंदी स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

इ. ५ वी प्रथम - चिन्मय जोगळे (५ ड)
द्वितीय - श्रावणी निवाते (५ क)
तृतीय - तनिष्का मुकादम (५ ब)
उत्तेजनार्थ - निकिता गायकवाड (५ अ)

इ. ६ वी प्रथम - संजना बोरवणकर (६ अ)
द्वितीय - सोहम सकपाळ (६ अ)
तृतीय - मानसी मांडवकर (६ अ)
उत्तेजनार्थ - आर्यन पाटील (६ क)

इ. ७ वी प्रथम - यश मिस्त्री (७ ड)
द्वितीय - रुपाली बिरादर (७ अ)
तृतीय - समर्थ पाटील (७ अ)
उत्तेजनार्थ - जागृती पवार (७ ड)

इ. ८ वी प्रथम – अथर्व सूर्यवंशी (८ ड)
द्वितीय – यशश्री कुर्डेकर (८ ब)
तृतीय – दिव्या म्हस्के (८ अ)
उत्तेजनार्थ – कृष्णा परमार (८ इ)

इ. ९ वी १० वी प्रथम – मिताली धुमाळ (१० अ)
द्वितीय – आदिती खडपेकर (९ अ)
तृतीय – प्राजक्ता शितोळे (१० अ)
उत्तेजनार्थ – आकांक्षा लोखंडे (१० क)

इ. ५ वी, ९ वी, १० वी च्या स्पर्धांचे परीक्षण कलाशिक्षक श्री. वैद्य सरांनी केले तर इ. ६ वी, ७ वी, ८ वी च्या स्पर्धांचे परीक्षण कलाशिक्षक श्री. कोळी सरांनी केले.

• दि. १५/१०/१८ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन मा. मुख्याध्यापक श्री. पांचाळ सर यांच्या सहकार्याने सौ. संगिता तातळे यांनी केले. 'वाचन प्रेरणा दिना' निमित्त विद्यार्थ्यांना वाचनाची गरज व महत्त्व पटवून दिले.

• दि. ७/९/१८ ते ११/९/१८ या कालावधीतले स्काऊट-गाईडचे Pre-ALT प्रशिक्षण सौ. कल्पना बोरवणकर यांनी घेतले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

### नर्सरी व पूर्व प्राथमिक विभाग

मराठी महिना अश्विन ज्यात नवरात्रीचा सण येतो. १० ऑक्टोबर घटस्थापनेचा दिवस. सामूहिक प्रार्थनेनंतर मुलांना नवरात्रीबद्दल थोडक्यात माहिती सांगण्यात आली. नऊ दिवस मुलांनी दिवसाच्या रंगाप्रमाणे कपडे घातले होते. नऊ दिवस नऊ रात्री देवीच्या विविध रूपांची पूजा करण्यात येते. भोंडला, गरबा, दांडिया खेळला जातो. आमच्या चिमुकल्यांनीही १२ ऑक्टोबरला हत्तीच्या प्रतिमेभोवती फेर घेऊन भोंडला साजरा केला. शेवटी नानकटाईच्या खिरापतीचा आनंद लुटला. १७ ऑक्टोबरला सरस्वती पूजन करून दसरा साजरा करण्यात आला. पूजा झाल्यानंतर मुलांना दसऱ्याची थोडक्यात माहिती सांगितली. घरी जाताना मुलांना त्यांनी स्वतः रंगविलेले दसऱ्याचे चित्र देण्यात आले.

१५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान नर्सरी, ज्युनियर व सिनियर विभागातील मुलांचे पहिल्या सत्राचे विविध विषयांचे मूल्यमापन करण्यात आले.

१ नोव्हेंबर पहिल्या सत्राची सांगता दिवाळी पार्टीने करण्यात आली. नर्सरी, पूर्व-प्राथमिक विभागाच्या व्हरांड्यामध्ये कंदील लावून रांगोळी काढली होती. वर्ग दिवाळीच्या चित्रांनी, तोरणांनी सजविला होता. सामुहिक प्रार्थनेच्यावेळी मुलांना दिवाळीची थोडक्यात माहिती सांगण्यात आली. तसेच त्यांना फटाके न वाजविता प्रदूषणविरहीत दिवाळी साजरी करा असा संदेश दिला. नंतर विभाग प्रमुखांनी दिवे लावून, मुलांनी गाऊन, नाचून दिवाळी साजरी केली. घरी जाण्यापूर्वी मुलांना लाडू आणि चकलीचा फराळ दिला. त्यांनी मोठ्या चवीने फराळाचा आस्वाद घेतला. जाताना मुलांना त्यांनी रंगविलेले दिवाळी चित्र देऊन सर्वांनी एकमेकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. मुलांच्या चेहऱ्यावर दिवाळी आनंद ओसंडून वहात होता. अशाप्रकारे पहिल्या सत्राचा शेवट मोठ्या आनंदात, उत्साहात झाला.

देशभरात राबवल्या जाणाऱ्या MR लसीकरणाबद्दल माहिती देणारा कार्यक्रम २ नोव्हेंबरला गार्गी सभागृहात घेण्यात आला. MR लसीकरणाचे महत्त्व, फायदे व गरज याबद्दल लायन्स क्लबच्या श्री. सुकुमार साखरदांडे यांनी पालकांना मार्गदर्शन केले. पालकांच्या शंकांचे निरसन करणारा महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**CASTIC – China Adolescent Science and Technology Innovation Contest चा निकाल :**

मागच्या वर्षीप्रमाणे यावर्षी देखील आमच्या शाळेतील ४ विद्यार्थ्यांनी ३३ व्या China Adolescent Science and Technology Innovation Contest (CASTIC), चाँगचिंग, चीन येथे भाग घेतला. अनुराग शेटे आणि सिद्धार्थ वेर्णेकर यांनी 'R-Bot : The Rescue Bot' हा प्रकल्प सादर केला. तसेच दिव्या कद्रेकरे आणि श्रिया दाणेकर यांनी 'Vehicle Pollution Detection and Control System' हा प्रकल्प सादर केला. दोन्ही प्रकल्पांना तिसरे पारितोषिक मिळाले व विद्यार्थ्यांना कांस पदके आणि प्रशिस्तीपत्रके मिळाली.

आमच्या शाळेचे भाग घेण्याचे हे १२वे वर्ष व पारितोषिक मिळवण्याचे ११वे वर्ष आहे.

**• विज्ञान प्रकल्प कसे करावेत हे शिकण्यासाठी आमच्या शाळेतील २ शिक्षिका व चार विद्यार्थ्यांनी 'बेल्ट आणि रोड टिनएजर कॅम्प' मध्ये भाग घेतला होता. विद्यार्थ्यांना प्रशिस्तीपत्रके मिळाली –**

१) शिक्षिका : सौ. पूर्णिमा साठे व सौ. गौरी मोहिले.

२) विद्यार्थी : ऋतुजा पाटणकर, मोहित जोशी, मिहीर आगाशे आणि आयुष म्हात्रे.

**• विद्या प्रसारक मंडळ आयोजित श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेचा निकाल :**

| गट | विजेतेचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| छोटा | गायत्री बेडेकर<br>अमृता बापट | १ले<br>२रे |
| मोठा | साक्षी जोशी<br>गौरांगी पाटील | २रे<br>३रे |

**• जिज्ञासा ट्रस्ट आयोजित पथनाट्य स्पर्धेचा निकाल :**

आमच्या शाळेला वरील स्पर्धेत दुसरे पारितोषिक मिळाले व आमच्या शिक्षिका सौ. वीणा जोशी यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले.

**• कु. मैथिली बापट हिला सरंजन शास्त्रीय गायन स्पर्धेत दुसरे पारितोषिक मिळाले.**

• क्रीडा – DSO तर्फे घेतलेल्या विविध स्पर्धांत आमच्या विद्यार्थ्यांनी खालील पारितोषिके मिळवली :

१) जलतरण – (अ) ओंकार राऊतने ५० मि. १०० मि. व २०० मि. फ्री–स्टाईल मध्ये सुवर्णपदक मिळवले. (ब) कौस्तुभ वारे, यतिश वैद्य, आर्यन डोके व सर्वेश डोके यांच्या संघाला ४ X १०० मि. रिले या स्पर्धेत जिल्हास्तरावर सुवर्ण पदक व मुंबई विभागीय स्तरावर कास्य पदक पटकावले.

२) बुद्धिबळ – जिल्हास्तरावरील स्पर्धेत शौनक धामणस्करने दुसरा तर विराज गोगटेने चौथा क्रमांक पटकावून मुंबई विभागस्पर्धेसाठी पात्र ठरले.

३) कॅरम –जिल्हास्तरावरील स्पर्धेत सर्वेश जाधवने प्रथम क्रमांक पटकावून मुंबई विभाग स्पर्धेसाठी पात्र झाला.

४) टेबल टेनिस –

(अ) अर्चिस करमरकर मुंबई विभागासाठी स्पर्धेसाठी पात्र ठरला.

(ब) जिल्हास्तरीय स्पर्धेच्या १४ वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेत शाळेच्या आद्यश्री जोग, मैथिली फाटक व पूर्वश्री देसाई यांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत मुंबई विभाग स्पर्धेसाठी पात्र ठरल्या.

(क) जिल्हास्तरावर शाळेची १४ वर्षाखालील मुलांच्या स्पर्धेत अर्चिस करमरकर, रुद्र पाटील, आत्मज अकोलकर व अर्नव मोडक यांनी द्वितीय स्थान पटकावले.

५) स्केटिंग – जिल्हास्तरीय स्पर्धेत आदिती मांडवकर हिने रजत पदक पटकावले व विभागीय पातळीवर आपले स्थान निश्चित केले.

**• संस्कृती कला दर्पण संस्थेतर्फे आयोजित आंतरशालेय विविध स्पर्धांचे निकाल :–**

**१) चित्रकला स्पर्धा :**

५ वी / ६ वी : द्वितीय – गार्गी कदम

उत्तेजनार्थ – वरद वाटवलकर, अस्मित सुर्वे, सावरी रसाळ, मिताली नाईक, शार्वरी मोहिते, अमोघ भिडे, धान्वी देशमुख, आर्यन निमकर, जय हलदंडकर, राधिका मराठे, गौतमी सहस्रबुद्धे, अस्मि गोरे, यश सिनलकर, देवश्री कुलकर्णी, मेघवी सावंत, संस्कार जाधव.

७ वी / ८ वी : प्रथम – श्रीया कदम

उत्तेजनार्थ – आरंभ कोरे, मोहक जोशी, पार्थ वैशंपायन, नंदिनी माने, मनस्वी टोपले, गार्गी लिमये, स्वराली हुद्देदार, साईश गीध, ओम शहाणे, श्रेया दांडेकर, गौरांग अंबावणे, विदुला चव्हाण, रिया जोगळेकर.

९ वी / १० वी : द्वितीय – रिचा ठाणेकर.

उत्तेजनार्थ – जान्हवी पाटील, दिशा पारेख.

**२) निबंध स्पर्धा :**

५ वी / ६ वी : प्रथम – शार्वरी मोहिते.

उत्तेजनार्थ – अस्मि चांदे, देवश्री कुलकर्णी, भूमिका चोर्गे, भव्या निसार, अस्मित सासणे, इशा फडके, विराज वाणी.

७ वी / ८ वी : प्रथम – सौम्या मराठे

उत्तेजनार्थ – निहारिका मोरे, स्वरांगी वस्ते, सोहम कदम, रुचिता निमकर, शार्वी कदम, श्रेया मोघे, श्रेया बेळगावकर, इशिता चव्हाण.

**३) भेटकार्ड स्पर्धा :**

५ वी / ६ वी : द्वितीय – हर्षिका साळुंके

उत्तेजनार्थ – मिष्टी चिटनिस, श्रावणी नाखवा, अस्मित सासणे, अस्मि चांदे, शर्वरी मोहिते, अर्जुन खेडेकर, मुग्धा जोशी, भूमिका चोर्गे, धान्वी देशमुख.

७ वी / ८ वी : द्वितीय – साईश गीध

उत्तेजनार्थ – ऋविज टेंडोलकर, अर्चिता मोदगी, शार्वी कदम, विदुला चव्हाण, संस्कृती पिसाट, हर्ष ठाकुर, पार्थ विसारिया.

९ वी / १० वी : द्वितीय – दिशा पारेख

उत्तेजनार्थ – यामिनी गायकवाड.

**४) गायन स्पर्धा :**

५ वी / ६ वी : प्रथम – गौतमी सहस्रबुद्धे

उत्तेजनार्थ – हर्षीता पाटील, यशश्री दाबोळकर, अर्थव गुंडे.

Indian Institute for Studies in Mathematics **आयोजित गणित प्रावीण्य शोध परीक्षेचा निकाल :**

यशस्वी विद्यार्थ्यांची यादी :

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ६ वी | सार्थक कुलकर्णी | ७३ वा |
| ६ वी | निहारिका मोरे | ९७ वा |
| ६ वी | गौरांगी पाटील | २३० वा |
| ७ वी | आर्या पेंडसे | ११२ वा |
| ७ वी | वेदांत साळुंखे | १०७३ वा |
| ९ वी | केतकी धर्माधिकारी | ९४ वा |
| ९ वी | अजिंक्य जोशी | २६६ वा |
| ९ वी | यश चाबूकस्वार | ११६९ वा |

**• बृहन् मुंबई अध्यापक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या Maths Concept Exam चा निकाल :**

| इयत्ता | श्रेणी | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| ५वी | ३ | ६ | २ | १८ |
| ८वी | १ | ३ | ८ | ७ |

शाळेतील प्रथम क्रमांकाचे विद्यार्थी :

| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५वी | तनिष्क लोणे | ९८ |
| ८वी | ईशान फणसे | ९६ |

**• दीनदयाळ केंद्रा तर्फे घेतलेल्या 'संस्कृत रामरक्षा श्लोक पठण' स्पर्धेचे निकाल :**

१) गार्गी भागवत – इ.८ वी – तृतीय क्रमांक

२) यामिनी गायकवाड – इ.९ वी – प्रथम क्रमांक

**• स्त्री कल्याण संघटनेतर्फे घेतलेल्या मराठी वक्तृत्व स्पर्धेचे निकाल :**

१) देवश्री कुलकर्णी – इ.५ वी – द्वितीय क्रमांक

२) गौतमी सहस्रबुद्धे – इ.६ वी – प्रथम क्रमांक

३) इशा लागू – इ.७ वी – द्वितीय क्रमांक

४) श्रेया मोघे – इ.८ वी – द्वितीय क्रमांक व ढाल विजेता

५) मृण्मयी गांगल – इ.८ वी – तृतीय क्रमांक व ढाल विजेता

**• संस्कार भारती आयोजित एक पात्री अभिनय स्पर्धेत प्रशस्तिपत्रक पटकावणारे विद्यार्थी खालील प्रमाणे**

१) संकल्प कोरे २) महेश्वरी राणे ३) शुभम लोखंडे ४) चिन्मय मोहिते ६) कृपा झुंझारराव ७) यशश्री दाभोळकर ७) निधी पटवर्धन

**• 'मुग्धा चिटणीस घोडके' स्मृतीप्रीत्यर्थ कथाकथन स्पर्धेत मैथिली बापटने तिसरे पारितोषिक पटकावले.**

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**वाचन प्रेरणा दिवस साजरा**



१५ ऑक्टोबर रोजी भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र भर वाचन प्रेरणा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात भारतीय इंग्रजी साहित्यात मोलाची भर टाकणाऱ्या लेखकांच्या साहित्याचे एक अनोखे प्रदर्शन भरवण्यात आले होते. आर. के. नारायण, मुल्कराज आनंद, राजा राव, अनिता देसाई, अमिश त्रिपाठी, आनंद निलकांतन, आश्विन संघी, चेतन भगत, शोभा डे, सुधा मूर्ती इत्यादी नामांकित लेखकांच्या साहित्यकृती ठेवण्यात आल्या होत्या. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. या वेळी उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे , ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, सहाय्यक ग्रंथपाल सौ. पाटील, प्रा. अनिल भाबड इत्यादी उपस्थित होते. विश्व साहित्यात भारतीय लेखकांनी आपल्या लेखनाने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यातील भारतीय इंग्रजी साहित्याला बुकर पारितोषिक मिळाले आहे. यातील अनेक साहित्यकृतींचे वाचन यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी करावे, तसेच वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी या हेतूने हे अनोखे प्रदर्शन भरवले गेले. कला व वाणिज्य विभागातील अनेक विद्यार्थी व प्राध्यापकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

कीर्तीमुळे माणसाचे जीवन एकलकोंडे बनते. यश हे बर्फासारखे थंड आणि उत्तर ध्रुवासारखे एकलकोंडे असते. – विकी बॉम

वाचन प्रेरणा दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वृत्तपत्र व संज्ञापन विभाग व मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांचे, 'वाचन संस्कृती आणि आपण' याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दिसामाजी काहीतरी ते लिहावे। प्रसंगी अखंडीत वाचीत जावे हा समर्थ रामदास स्वामी यांचा विचार मांडत, विद्यार्थ्यांना वाचन कौशल्ये वृद्धिंगत करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या अनेक नवनवीन प्रयोगांवर प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी प्रकाश टाकला. ज्येष्ठ लेखक व निबंधकार सर फ्रान्सिस बेकन याच्या Reading maketh a full man; conference a ready man; and writing an exact man हे वचन उद्धृत करत वाचनाने व्यक्तिमत्त्व विकासात मोलाची भर पडते असेही प्रा धर्माधिकारी म्हणाले. यावेळी काही विद्यार्थ्यांनी त्यांचे आवडते लेखक व त्यांचे वाचन याविषयी आपले विचार मांडले, तसेच पु. ल. देशपांडे यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकातील काही निवडक उताऱ्यांचे वाचन दिशा सरमाळकर, गार्गी बोरगावकर व फरीयल सयद या विद्यार्थिनींनी केले.

या कार्यक्रमास अनेक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

**स्टाफ अकॅडमी तर्फे ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. अद्वैत पेडणेकर यांचे व्याख्यान**




दि. १९ऑक्टोबर रोजी स्टाफ अकॅडमी तर्फे ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. अद्वैत पेडणेकर यांचे 'वैज्ञानिक दृष्टीकोन व अध्यापन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. शिक्षकांनी एक विशिष्ट वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये विकसित करावा असे मत श्री. पेडणेकर यांनी व्यक्त केले.

**स्वप्न साकारत आहे....**
**जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव**



जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव वर्षाची सुरुवात आज महाविद्यालयाच्यावतीने दिमाखदार पण कौटुंबिक स्वरूपात करण्यात आली.

विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून व त्यांचे आशीर्वाद घेऊन कार्यक्रमाचा श्री गणेश केला.

त्या नंतर आठवणीच्या हिंदोळ्यावर या फलकाचे ही अनावरण केले, ज्यामध्ये माजी विद्यार्थी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. संगीता दीक्षित यांचा लेख, १९८१ सालच्या माजी विद्यार्थिनी सौ. प्राची अष्टमकर यांची स्वलिखित कविता, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मनोगत तसेच अॅड. संतोष भामरे यांनी रेखाटलेले गांधीजींचे छायाचित्र प्रदर्शित करण्यात आले.

त्यानंतर कात्यायन सभागृहात प्राचार्या डॉक्टर सुचित्रा नाईक, कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. देशपांडे, प्रमुख पाहुणे गायक श्री. मिलिंद इंगळे, Surge च्या अध्यक्षा अॅड. माधवी नाईक या सर्वांची भाषणे झाली. विद्या प्रसारक मंडळाचे सचिव श्री. उत्तम जोशी हे आवर्जून उपस्थित होते.

प्रत्येक मोठ्या कुटुंबात एक संत आणि एक सैतान हा असतोच. - सर हेन्सी वॉटॉव्ह

कार्यक्रमच्या सुरुवातीला महाविद्यालयाचा एक छोटासा टीजर दाखवण्यात आला. अशा प्रकारे जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या सुवर्ण पर्वाचे एक नवीन पान आज उघडले......

**आठवणीतील कविता**



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण वर्षभर अनेक दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यातील एक आगळावेगळा 'आठवणीतील कविता' हा काव्यवाचनाचा कार्यक्रम विद्या प्रसारक मंडळाचे सचिव श्री. उत्तम जोशी यांच्या संकल्पनेतून दि. २२ ऑक्टोबर २०१८ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी ज्येष्ठ इंग्रजी कवी इझ्रा पाउंड यांच्या Literature is a news which stays news या वचनाचा उल्लेख करत कविता ही नेहमी नित्य नूतन नवी असते असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विद्या प्रसारक मंडळाचे सचिव श्री. उत्तम जोशी म्हणाले की, जुन्या पिढीतील प्रत्येकाने आपल्या लहानपणी आईच्या तोंडून अंगाई गीतांच्या स्वरूपात विविध गीते आणि कविता ऐकलेल्या आहेत. किंबहुना या प्रकारचे गाणे आणि कविता ऐकतच प्रत्येक जण मोठा झालेला आहे. ही गीते आणि कविता हा त्या काळातील संस्काराचा एक अविभाज्य घटक होता. शिशु वर्गातून पुढे शाळेत गेल्यानंतर अभ्यासक्रमातील छान छान गेय कविता प्रत्येकाच्या मुखी असत. लहानपणी शिकलेल्या या कविता अनेक वर्षांनंतर सुद्धा अनेकांना तोंडपाठ आहेत. अलीकडच्या काळात सगळ्यांना मुक्तछंदातल्या कवितेची सवयच होऊन गेली आहे. कवीही मुक्तछंदातच लिहितात आणि वाचकांनाही त्यामुळे तेच अपेक्षित असते. पण अचानक एखादी गेय कविता समोर येते आणि कुणीतरी खूप जुन्या ओळखीचं भेटल्याचा आनंद होतो. जुन्या गेय कवितांना नाद आहे, लय आहे, त्यांची यमकं अतिशय सुंदर रीतीने जुळवलेली असतात. त्यामुळे त्या वाचायच्या नव्हेत तर गुणगुणायच्या कविता झालेल्या आहेत. अशा अनेक कविता आपण अभ्यासक्रमात शिकलो आहोत. शाळेत असताना मराठीच्या पाठ्यपुस्तकातील कित्येक कवितांचा सुगंध आपल्या आठवणीत दरवळत राहिलेला आहे. अशा अनेक जुन्या कविता आहेत ज्यांनी मराठी जनमानसावर राज्य केले आणि या कविता विद्यार्थी जीवनात प्रत्येकाच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग होत्या. अशा अनेक कविता आज काळाच्या पडद्याआड जाऊन विस्मृतीत जात आहेत किंवा जाऊ शकतात. अजूनही अनेकांना या कविता गायला किवा ऐकायला आवडतील याची आम्हाला खात्री आहे. म्हणूनच अशा जुन्या गेय कवितांचा कार्यक्रम करावा असा आजच्या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

या कार्यक्रमात जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे युनीफाईड प्लेसमेंट सेलचे डॉ. जोशी, वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. नायक तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. संगीता दीक्षित, पर्यवेक्षक त्रिवेणीप्रसाद शर्मा तसेच वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. सुचित्रा नाईक यांनी

आपण आपल्या कल्पनाशक्तीला मैत्रीण म्हणून बरोबर जरूर घ्यावी; पण बुद्धीलाच मार्गदर्शक म्हणून नेमले पाहिजे. - एस. जॉन्सन

बालकवींची 'औदुंबर' ही कविता सादर केली. श्री. उत्तम जोशी यांनी 'श्रावणबाळ' ही कविता सादर केली तर सौ. सुमेधा बेडेकर यांनी 'सरस्वतीची भूपाळी' ही कविता सादर केली.

प्रा. बारसे यांनी कुसुमाग्रजांची 'कणा' ही कविता सादर केली. प्रा. सुहासिनी दहिवले यांनी 'खांब' तर प्रा. भावना देशमुख यांनी 'गाभारा' तर डॉ. विमुक्ता राजे यांनी 'सावरकरांच्या सागरा प्राण तळमळला', प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी ग. ल. ठोकळ यांची 'वाढा भिक्षा माई', प्रा. प्रकाश जंगले यांनी विंदा करंदीकर यांची 'माझ्या मना बन दगड', डॉ. अनिल ढवळे यांनी 'मासोळी', प्रा. संतोष राणे यांनी अनंत फंदी यांचा 'फटका', प्रा. संगीता दीक्षित यांनी 'गाई पाण्यावरती काय म्हणुनी आल्या' इत्यादी कविता सादर केल्या.

यावेळी अनेक प्राध्यापकांनी आपापल्या आगळ्यावेगळ्या शैलीत हृदयाचा ठाव घेणाऱ्या उत्तमोत्तम कवितांचे सादरीकरण केले. भा. रा. तांबे, कुसुमाग्रज, बी, गोविंदाग्रज, ग. ल. ठोकळ, बालकवी, विंदा करंदीकर आदी मान्यवर कवींच्या अजरामर कवितांना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले.

### राष्ट्रीय एकता दिवस साजरा



दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये स्वर्गीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस त्याचबरोबर वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक यांनी इंदिरा गांधी आणि वल्लाभाई पटेल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केले. याप्रसंगी ग्रंथपाल प्रा नारायण बारसे, सहायक ग्रंथपाल सौ. मनीषा पाटील, मराठी विभागप्रमुख प्रा. अनिल भावड, हिंदी विभागप्रमुख डॉ. अनिल ढवळे व इतर मान्यवर प्राध्यापक आणि ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती वाढीस लागावी म्हणून आगळा उपक्रम




विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती वाढीस लागावी ह्या उद्देशाने जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या अकाउटींग फायनान्स विभागातर्फे इंडस्ट्री रिसर्च म्हणजेच उद्योग संशोधन हा 'अॅड ऑन कोर्स' नुकताच राबविण्यात आला. महाविद्यालयातील विविध अभ्यास शाखांमधील १०० विद्यार्थ्यांनी ह्या 'अॅड ऑन कोर्स'मध्ये संशोधनाच्या विविध पायऱ्यांचा व महत्त्वाच्या अंगांचा अभ्यास केला. दि. २१ सप्टेंबर ते २४ ऑक्टोबर ह्या कालावधी दरम्यान विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच संशोधक प्राध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ह्या कोर्स दरम्यान विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. अकांउटींग फायनान्स ह्या अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. निलम शेख तसेच

प्रा. शेफाली कोंडेवार, प्रा. विनोद चारवानी, प्रा. मुग्धा केसकर, प्रा. सिंधू नटूवेती यांनी परिश्रम घेतले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा 'अॅड ऑन कोर्स' यशस्वीपणे राबविण्यात आला.

**क्रीसलीस २०१९**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी - बेडेकर महाविद्यालयात ख्रिसलीस नावाच्या भव्य कार्यक्रमाच्या निमित्ताने कात्यायन सभागृहात एका पॅनल चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या पॅनल चर्चेला अॅड. नीतिन वासुदेव गांगल, रिलॅक्स रिटेल कंपनीचे उपाध्यक्ष प्रसाद टोकेकर व APB माझा न्युज चॅनेलच्या वरिष्ठ अँकर ज्ञानदा कदम यांनी उपस्थिती दाखवली. कार्यक्रमाच्या सुरवातीला महाविद्यालच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ही तिन्ही मंडळी आपआपल्या क्षेत्रात संपूर्णता परिपूर्ण आहेत याचे प्रमाण त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या उत्तरातूनच कळाले. अॅड. नीतिन सर हे पेशाने वकील असल्याने त्यांनी या क्षेत्रातले महत्त्व तितक्याच गांभीर्याने पटवून दिले. त्यांना जेव्हा असा प्रश्न विचारला की, 'तुम्ही दोन्ही बाजूचा समतोल कसा राखता?' त्यावेळेस ते म्हणाले की, 'वकील होणे तितके सोपे नाही कॉलेजच्या वेळेस खूप धमाल केली. विचार नव्हता कधी वकिली करण्याचा. पण त्यांच्या घरात वकील होण्याची परंपराच होती जणू आणि त्यांचे कॉलेज पूर्ण झालं आणि नकळत या क्षेत्राकडे ते वळले. या जगात जगायचे असेल तर आर्थिक दृष्ट्या पैसाही तितकाच महत्त्वाचा ठरतो. मग अशा वेळेस एखाद्या गरजू व्यक्ती तुम्हाला येऊन एखाद्या केससाठी विनवणी करताना दिसते. तेव्हा तुम्ही धर्मसंकटात पडल्यासारखे होता. थोडक्यात सांगायचे झाले तर त्यांना माझी फी परवडत नाही. आणि अशा कारणामुळे अनेक लोकांना इच्छा असून मदत करता येत नाही' असे म्हणत त्यांनी त्यांच्या आयुष्यात घडलेली एक गोष्ट मांडली ती अशी होती की, 'एकदा ते गाडीतून उतरले कोर्टात जाण्यासाठी. परंतु एका व्यक्तीने येऊन त्यांचे पाय पकडले व म्हणाले की, 'माझी मदत करा पण माझ्याकडे पुरेसे पैसे नाहीत' अशा वेळेस खरंच आपण त्यांना उत्तरं काय द्यायचे हेच कळत नाही. असा त्यांनी त्यांच्या आयुष्याचा प्रवास त्या ठिकाणी मांडला. त्याचप्रमाणे इंजिनियरिंग मधून कॉलेज पूर्ण करणारे रिलॅक्स रिटेलचे आत्ताच्या घडीला उपाध्यक्ष म्हणून ज्यांना ओळखले जाते ते म्हणजे प्रसाद टोकेकर सर. आज त्यांना बरीच वर्षे झाली रिलॅक्स मध्ये काम करताना. परंतु त्यांना या प्रवासात अनेक चढउतार पाहिले आहेत पण कोणत्याही प्रसंगाला हसत तोंड देणे हीच त्यांची काम करण्याची पद्धत. त्यांना पॅनल चर्चेत असा प्रश्न विचारला की, 'तुम्ही या क्षेत्राकडे कसे वळलात' तेव्हा त्यांनी सांगितले की कुठलेही क्षेत्र जेव्हा आपण निवडतो त्यावेळी त्यात आनंद मानायचा व त्या क्षेत्रात आवड निर्माण करण्याची आवड निर्माण झाली की आपोआपच आपल्याला रस वाटू लागतो. त्यामुळे आनंद घेत काम करा कधीच अपयश येणार नाही. आणि ते असे ही म्हणाले की, 'मी अभ्यासात कधी कच्चा नव्हतो म्हणून मी जास्त पुढे गेलो. अकाउंट सारखे विषय मी सहज सोडवायचो म्हणून नेहमीच तुम्ही प्रयत्न करत राहा. असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

सध्या सर्वात आकर्षणचा आणि चर्चेचा विषय असलेल्या इलेक्ट्रॉनिक माध्यम म्हणजे वेळेशी स्पर्धा. कोणतेही न्यूज चॅनल लावले की सर्वप्रथम झळकतो अँकरचा चेहरा. गेली १३ वर्षे APB माझा या चॅनलच यशापयश पेलवणाऱ्या अँकर पैकी एक म्हणजे ज्ञानदा कदम. इलेक्ट्रॉनिक माध्यमात वेळेची किंमत करावी लागते. प्रत्येक सेकंद आणि मिनिटांचा हिशेब ठेवावा लागतो. रोजच्या ९ ते ५ नोकरीपेक्षा वेगळे काहीतरी

करण्याचे ध्येय असलेल्या ज्ञानदाने स्वतःच्या बोलक्या स्वभावावरून तसेच लोकांच्या ओळखी वाढवणं या स्वतःतील गुणावरून हे क्षेत्र निवडले आणि त्या नुसार जर्नलिझम हा अभ्यासक्रम पूर्ण केला. वझे केळकर महाविद्यालयातून पोलिटिक्स सायन्स या विषयात बीएची पदवी पूर्ण केल्यानंतर मुंबई मराठी पत्रकार संघातून पत्रकारितेच्या कोर्सदरम्यानच आकाशवाणी केंद्रात चर्चगेट येथे तिने सहा महिने काम केले.

जेव्हा त्यांना विचारण्यात आले की, तुम्ही एबीपी माझा चॅनलला कसे काय नोकरीला लागलात तेव्हा त्या अशा म्हणाल्या की, आकाशवाणीचा वाणी कोर्स पूर्ण केला. आकाशवाणीत काम करत असतानाच एबीपी माझा मध्ये काम करण्याची संधी चालून आली. मुलाखत पास होऊन एबीपी माझा चॅनलवर काम सुरू केले, असे ज्ञानदाने सांगितले.

त्यांना जेव्हा दुसरा प्रश्न विचारला की, 'न्यूज तुम्ही नेहमीच देता परंतु अशी एखादी वेळ जिने तुम्हाला घामाघूम केले असावे? त्यावर त्या म्हणाल्या की आज-कालच्या काळात स्पर्धा ही प्रत्येक क्षेत्रात आहे आपण किती बेस्ट आहोत हेच सर्वजण सिद्ध करण्याच्या मागावर असतात. मग अशा परिस्थितीत कोणतेही न्यूज चॅनल लावले असता प्रेक्षकांना दिसतो बातम्या सांगणाऱ्या अँकरचा चेहरा, त्यामुळे सतत फ्रेश ताजेतवाने दिसणे गरजेचे असते पण एखाद्या वेळी बातम्या अचानक घडलेली घटना त्या संदर्भात बातमी थेट अँकरच्या कानात लावलेल्या एअरफोन मध्ये जाऊन पोहचतात. असाच एक प्रसंग माझ्या आयुष्यात घडला होता. ज्या वेळी मा. बाळासाहेब ठाकरे ज्या वेळेस जीवन-मरणाच्या टप्प्यात अडकले होते. तेव्हा त्यांचा म्हणजेच एबीपी माझाचा कॉल थेट डॉक्टरांशी कनेक्ट झाला होता. परंतु नेटवर्क कमी असल्याने मला पूर्ण वाक्य समजले नव्हते की ते नक्की कोमात आहेत की स्वर्गवासी झालेत. अशी ती वेळ होती ज्यात मी काय बोलू मला सुचत नव्हते. अशाच प्रकारचे बरेच उतार-चढाव आले आयुष्यात असं त्या म्हणाल्या.

चर्चेच्या शेवटी सगळ्या पाहुण्या मंडळीनी विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन केले व भावी आयुष्यात पुढे जाण्याच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मानसी जंगम व प्रा. अर्चना नायर यांनी केले. प्रा. पूर्वा गायकवाड यांनी ख्रिसलीसच्या आयोजनाची जबाबदारी सांभाळली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### संस्कृत दिन समारोह

श्रावण पौर्णिमेला साजरा केला जाणारा संस्कृत दिवस याहीवर्षी वि.प्र.मं.च्या बा. ना. बांदोडकर महाविद्यालयामध्ये संस्कृत भारती संस्थेच्या संयुक्त विद्यमाने दि.०४ सप्टेंबर २०१८ रोजी साजरा करण्यात आला. वझे केळकर महाविद्यालयाच्या संस्कृत प्राध्यापिका सौ. अदिती माधवन या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुष्का, कु. स्वरांगी मोरे व कु. मोदिनी प्रधान या बारावीच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्टरित्या केले. हिंदी सिनेमांतील प्रसिद्ध गाण्यांचे संस्कृत अनुवादित गीते, गीतेचे महत्त्व जाणून घेऊन गीतेचा पंधरावा वा अध्याय सादर केला. जनगणनेवर आधारित एक संस्कृत नाटिका सादर केली.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते अकरावी च्या विद्यार्थिनींनी केलेल्या प्रदर्शनाने. यामध्ये धान्य, भाज्या, प्राणी, रंग, गृहोपयोगी वस्तू यांना संस्कृतमध्ये काय म्हणतात याची नावे दिली आहेत. तसेच कालिदासाची नाटके, संस्कृत साहित्य यांचे पोस्टर्स देखील लावले होते.

प्रमुख पाहुण्या अदिती मॅडम यांनी अत्यंत सुलभ

शेकडो प्रार्थना म्हणून जे पुण्य संपादन करता येणार नाही, ते काळजीपूर्वक शेत नांगरण्याने पदरी पडते. - इरतुष्ट्र

पद्धतीने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या अभ्यासक्रमावर आधारित कृतीपत्रिकेवरील काही प्रश्नांवर त्यांनी खेळ घेतले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांचा देखील उत्स्फूर्त सहभाग लाभला. त्यानंतर प्राचार्या डॉ. सौ. माधुरी किरण पेजावर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. संस्कृतची गरज व संस्कृतचे फायदे हे मुलांना पटवून दिले.

**'वेडं वय आणि मायावी मोहजाल'**

जागर जाणिवांचा अभियानाचे उदघाटन प्राचार्या. डॉ. माधुरी पेजावर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणामध्ये 'वेडं वय आणि मायावी मोहजाल' या विषयावरील आपले विचार मांडले.

सध्याचे जग हे विविथ आकर्षणं, प्रलोभने व मोहजालाचे आहे. यामध्ये स्वतःला अलिप्त ठेवणे फारच जिकिरीचे होऊन बसले व उंबरठ्यावरील वयात ही सर्व आकर्षणे खुणावत असताना विद्यार्थ्यांनी स्वतःला कसे जपावे? याचा शास्त्रशुद्ध भाषेत व विविध उदाहरणांद्वारे आपल्या ओधवत्या शैलीत आढावा घेतला व आपल्या बीजभाषणाला सुरुवात केली.

ऐन तारुण्यात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. मग ते शारीरिक असेल. मानसिक असेल किंवा सामाजिक असेल. परंतु मनी महत्त्वाकांक्षा बाळगून व निश्चय अढळ ठेवून या सर्वाला समर्थपणे सावरता येते. असे सांगताना त्यांनी प्राणीशास्त्राच्या अनुषंगाने अनेक दाखले देत आपल्या मुद्दांना पुष्टी दिली.

संवेदनशील विषयांना सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा सल्ला देत डॉ. माधुरी पेजावर यांनी सर्व श्रोत्यांना अंतर्मुख केले.

**'बांदोडकर विज्ञान महाविद्यालय खेळातही सर्वोत्तम'**

विज्ञान क्षेत्रातील पन्नास वर्षांतील समृद्ध परंपरा असलेल्या या महाविद्यालयातून कला, क्रिडा, संशोधन व सामाजिक बांधिलकी अशा विविध प्रकारांत आपला वेगळा ठसा उमटवित आहे.

याही वर्षी विविध क्रीडा प्रकारांतून बांदोडकरच्या विद्यार्थ्यांनी अव्वल स्थान मिळवून बाजी मारली आणि आपले वर्चस्व सिद्ध केले. यामध्ये विभागीय स्तरावर १९ वर्षाखालील वयोगटातून कॅरम मध्ये आदर्श सुरेश उबाळे याला सुवर्णपदक प्राप्त झाले व त्याची विभागीय स्तरावर निवड झाली.तर बुद्धिबळ स्पर्धेत सृष्टी अनिल निकम हीची कांस्यपदक मिळून विभागीय स्तरावर निवड झाली. त्याचप्रमाणे किक बॉक्सिंग स्पर्धेत मयुरेश घोडके, ऋतिक भिमाशंकर हडपड़ व राजकिरण तानपुरे यांची विविध गटांतून सुवर्णपदक मिळून विभागीय स्तरावर निवड झाली. तर मृणाल प्रभाकर जगतापने रौप्य पदक पटकावून विभागीय स्तरावर आपले स्थान पक्के केले.

**'बांदोडकर महाविद्यालयाचे प्रा. विनोद थोरात यांचे कॅरम क्रीडा प्रकारांत राज्यस्तरीय यश'**

नुकत्याच रॉयल कॉलेज मिरारोड आयोजित प्राध्यापकांसाठी राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन झाले. यामध्ये एकूण २१ महाविद्यालयातील विविध विषयांचे प्राध्यापक सहभागी झाले होते. एकवीस महाविद्यालयांतून फक्त तीनच विजेते घोषित करण्यात आले. यामध्ये बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे गणित विभागाचे प्राध्यापक श्री. विनोद थोरात हे सुवर्णपदकाचे मानकरी ठरले.

**बांदोडकर महाविद्यालयाच्या फ्रेंडस ऑफ लायब्ररी क्लबतर्फे वाचन प्रेरणा दिन संपन्न**

दरवर्षीप्रमाणे बांदोडकर महाविद्यालयाच्या फ्रेंडस ऑफ लायब्ररी क्लबतर्फे वाचन प्रेरणा दिन १५ ऑक्टोबर २०१८ रोजी संपन्न झाला. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

फॅशनच्या नादाने जेवढा कपड्यांचा नाश होतो, तेवढा माणसाच्या वापरामुळे होत नाही. – शेक्सपीअर

यावेळी वाचन : एक कला यावर सौ. नंदिनी बर्वे, निवृत्त शिक्षिका, सरस्वती मराठी स्कूल यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी मॅडमने विद्यार्थ्यांना एक गोष्ट आवर्जून नमूद केली. ती म्हणजे अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. त्या बोलताना म्हणाल्या की प्रत्येकाला वाचनाचे व्यसन लागले पाहिजे. रोज काहीतरी वाचन केल्याशिवाय दिवस पूर्ण झाला नाही ही भावना प्रत्येकाच्या मनात आली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले.

अतिशय रुचकर शब्दात वाचन काय व कसे करावे याबद्दल बर्वे मॅडमनी सर्वांना मार्गदर्शन केले. यावेळी 'गितेशी माझा परस्पर' यावर कु अभिजित घुले या विद्यार्थ्याने आपले विचार मांडले. कु. अभिषेक जाधव या विद्यार्थ्याने दुष्काळावर स्वरचित काव्यात्मक प्रवासवर्णन सादर केले. यावेळी कु. अपराजिता कनोजिया या विद्यार्थिनीने डॉ. अब्दुल कलाम यांच्या विंग्स ऑफ फायर या पुस्तकातील एका पाठाचे वाचन केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या माजी विद्यार्थ्यांच्या 'स्नेहबंध' कार्यक्रमाचे आयोजन

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या माजी विद्यार्थ्यांच्या 'स्नेहबंध' ह्या कार्यक्रमाचे आयोजन दि. ८ सप्टेंबर २०१८ रोजी सायंकाळी ४.३० ते ७.०० या वेळेत पतंजली सभागृहात उत्साहात पार पडले.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस तंत्रनिकेतनच्या विविध उपक्रमासंबंधीची चित्रफीत उपस्थितांना दाखविण्यात आली. संस्थेची सुरुवात १९८३ पासून झाली. तेव्हा पासूनचे विद्यार्थी हे सदर माजी विद्यार्थीकरिता आयोजित करून स्नेहबंध कार्यक्रमास उपस्थित होते. पतंजली सभागृह हे भरगच्च भरले होते. प्रत्येकजण आपआपल्या गुरूला वंदन करत होते. वातावरण अगदी उत्साहाने भरले होते.

कार्यक्रमा दरम्यान तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांनी तंत्रनिकेतनच्या प्रगतीचा आढावा सादरीकरणाद्वारे उपस्थितांना करून दिला.

डॉ. बेडेकर सरांनी माजी विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला व ते जेव्हा परदेशात जातात तेव्हा त्यांना तंत्रनिकेतनचा विद्यार्थी भेटतोच भेटतो. अशाच एका भेटलेल्या विद्यार्थ्याची कहाणी त्यांनी उपस्थितांना सांगितली. तेव्हा सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. डॉ. बेडेकर सरांनी आपल्या मनोगतातून अडचणीतून मार्ग काढण्यासाठी संस्थेला मदत करण्याचे आवाहन केले. शिवाय वेळोवेळी अशा कार्यक्रमांच्या आयोजनाने संस्था आणि माजी विद्यार्थी यांच्यात संवादाचे वातावरण निर्माण होईल व माजी विद्यार्थ्यांकडून जे आता विद्यार्थी शिकतात त्यांना मार्गदर्शनही होईल व ज्ञानाचे आदान-प्रदान होईल असाही मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमा दरम्यान माजी विद्यार्थ्यांच्या कार्यकारिणीची रुपरेखा आणि कार्य प्रा. सौ. व्ही. ए. जोशी मॅडम यांनी सांगितली. काही माजी विद्यार्थ्यांनी आपापली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. डॉ. कीर्ती आगाशे यांनी केले.

### भारतीय डाक पेमेंट बॅंक

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे येथे 'भारतीय डाक पेमेंट बॅंक' विषयीचे अभियान दि. ११ ऑक्टोबर २०१८ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत तंत्रनिकेतनच्या A.V. रुममध्ये पार पडले.

'भारतीय डाक' भारत सरकारच्या सूचना मंत्रालयातर्गत हा विभाग येतो. १ एप्रिल १८५४ रोजी भारतीय डाकची सुरुवात झाली. सध्या ह्या विभागाद्वारे विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. पूर्वीच्या पत्रव्यवहाराची जागा आता इलेक्ट्रॉनिक माध्यमाने घेतल्याने भारतीय डाक ते ही विविध माहिती तंत्रज्ञान आधारित सेवा आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. 'भारतीय डाक पेमेंट बॅक' ही अग्रगण्य बँकिग सेवा ग्राहकासाठी उपलब्ध करून दिली आहे. ह्याच सेवेची माहिती श्री. संदीप जाधव सिनियर पोस्ट मास्टर यांनी उपस्थितांना करून दिली.

**वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा**

'वाचन प्रेरणा दिन' विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनात दिनांक १५ ऑक्टोबर २०१८ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. सदर दिन भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षीही विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालयाच्या वाचन कक्षात सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितानी डॉ. अब्दुल कलाम यांच्या Wings of Fire, Ignited Minds आणि इतर पुस्तकाचे वाचन केले.



सदर कार्यक्रमास प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक, विभाग प्रमुख डॉ. कीर्ती आगाशे ग्रंथालय इनचार्ज डॉ. गीताली इंगवले तसेच ग्रंथालय साहाय्यक श्री. चंद्रकांत शिंगाडे आणि ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते. सदर प्रसंगी प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांनी वाचनाचे महत्त्व या विषयी मनोगत व्यक्त केले. बहुतेक उपस्थित वाचकांनी वाचनाचा आनंद लुटला. सदर ठिकाणी ग्रंथ प्रदर्शन मांडण्यात आले होते.

**वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनात, सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून उत्साहात साजरा**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे तर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. सरदार वल्लभभाई पटेल यांचा ३१ ऑक्टोबर हा जन्मदिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून संपूर्ण देशात पाळण्यात येतो.



सदर कार्यक्रम वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनात ए. व्ही. रूम मध्ये दुपारी ४.०० ते ५.०० या वेळात पार पडला.

सदर कार्यक्रमादरम्यान राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेतली. सदर कार्यक्रमास प्राचर्य डॉ. दि. कृ. नायक हजर होते.

विभाग प्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने हजर होता.

•••

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

वखारी निर्माण झाल्या. तत्कालीन भारताच्या 'अव्यवस्थेचा' त्यांनी पुरेपूर फायदा उठवायला सुरुवात केली. १७५७ मधील प्लासीची लढाई, आणि १८५७ मधील पहिले भारतीय स्वातंत्र्ययुद्ध, या काळामध्ये व्यापारी ईस्ट इंडियाकंपनी हळूहळू राज्यकर्ती व्हायला लागली. १७६५ मधील अलाहाबादच्या करारामुळे तत्कालीन मुघल सत्ताधीशांनी बंगालमधील करवसुलीचे अधिकार म्हणजे 'दिवाणी' ईस्ट इंडिया कंपनीकडे सोपवली.

इंग्रजी 'व्यवस्थेच्या' उत्कर्षाची आणि भारतीय व्यवस्थेच्या अधोगतीची ती सुरुवात होती.

१८५७ चे युद्ध इंग्रज जिंकले व भारतावर राणीचे राज्य सुरू झाले. आधीच्या १०० वर्षांमध्ये महसूल व्यवस्थेपासून, शिक्षणव्यवस्थेपर्यंतच्या सर्व 'भारतीय' व्यवस्थांचे संक्रमण 'इंग्रजी' व्यवस्थेच्या अनुरूप होऊ लागले. १८३५ च्या मेकॉलेच्या शैक्षणिक व्यवस्थेनी या नवव्यवस्थेला फार मोठे बळ दिले.

संबंध भारताकरता त्यावेळी बनारस (काशी) हे शिक्षण, व धर्म व्यवस्थेचं एक मोठं केंद्र होतं. १७९१ साली तिथे 'बनारस संस्कृत विद्यालयाची' स्थापना झाली. याचा मूळ उद्देश हा संस्कृत पाठशाळेला 'पर्यायी' व्यवस्था निर्माण करण्याचा होता. म्हणून तिथे मूळ शिक्षण हे संस्कृतकेंद्री होते. लौकरच पंडितांना इंग्रजी शिक्षण द्यायला सुरुवात झाली. एका 'परिवर्तनाची' ती सुरुवात होती. हा बदल फक्त भाषेतला नव्हता, तर जीवनशैलीपासून ते सांस्कृतिक व्यवस्थेपर्यंतचा होता.

भारतीय व्यवस्थांच्या 'पाश्चिमात्यी' करणाची ती सुनियोजित सुरुवात होती. हळूहळू अनेक पंडित, त्यांचे प्राथमिक शिक्षण जरी पाठशाळेत झाले असले तरी पुढील शिक्षणाकरता बनारस संस्कृत विद्यालयात येऊ लागले. तिथे इंग्रजीबरोबर त्यांना पाश्चात्य विज्ञान शिकवायला सुरुवात झाली. सुरुवातीला बेकनपासून न्यूटनपर्यंतच्या ग्रंथांची भाषांतरे संस्कृतमध्ये व्हायला लागली. याच बरोबर भारतीय संस्कृतीचा मागासलेपणा व पाश्चात्य संस्कृती व विज्ञानाच्या पुढारलेपणाची मात्रा ही पंडितांना मिळू लागली.

१८५३ साली या महाविद्यालयाचे रूपांतर एका मोठ्या विद्यापीठात करण्यात आले. याची नवीन बांधलेली इमारत ही नव गोथीक स्थापत्यरचनेनुसार बांधली गेली. यात शिरणारा प्रत्येक पंडित हा स्थापत्य शैलीप्रमाणे, पाश्चात्य सांस्कृतिक व्यवस्थेने भारावून जाऊ लागला. आज तिथे 'संपूर्णानंद विश्वविद्यालय' आहे.

इंग्रजांनी शैक्षणिक व्यवस्थेमधील बदलाचे हे प्रारूप (बनारस मॉडेल), मुंबई व दक्षिणेकडेही कमी अधिक प्रमाणात राबवले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातल्या बहुतेक विचारवंतांची पीढी ही या इंग्रजी शिक्षणाच्या व्यवस्थेतून बाहेर पडलेली होती. मेकॉलेच्या स्वप्नाप्रमाणेच ते हाडामासाने 'भारतीय' तर आचारविचार व संस्कृतीनी 'पाश्चात्य' संस्कृतीचा भाग होऊ लागले होते.

परंपरागत पाठशाळा, त्यातील व्याकरण, मिमांसेपासून ग्रहगणितापर्यंतचे शिक्षण, एका अत्यंत तरल, विश्लेक्षण क्षमता असलेल्या पंडिताची निर्मिती करत होत्या. ती व्यवस्था हळूहळू इतिहासजमा व्हायला लागली. आणि या पाठशाळांचे रूपांतर 'पाठांतर' शाळेत झाले की, जे आजही चालू आहे. पाठशाळा या फक्त पंडितांकरता होत्या. बहुसंख्य समाजाच्या शिक्षण व्यवस्था या त्यांच्या परंपरागत व्यवसायाच्या कौशल्य-विकासातून होत होत्या. मेकॉलेच्या इंग्रजी शिक्षण व्यवस्थेनंतर या सगळ्या परंपरागत शिक्षण व्यवस्था मोडीत निघाल्या. त्याचा भयंकर परिणाम त्यांच्या समाजव्यवस्थांवर झाला.

मुघल व इंग्रजी आक्रमकांमध्ये एक फार मोठा फरक होता. इंग्रजांना नुकत्याच युरोपमध्ये होत असलेल्या प्रबोधन युगाची पार्श्वभूमी होती. ग्रीक, लॅटिन भाषेप्रमाणेच त्यांच्या व्यवस्थांचेही संस्कार त्यांच्यावर होते. इंग्रजांप्रमाणेच फ्रेंच, पोर्तुगीज व स्पॅनिश वसाहतवादालाही याचवेळी सुरवात झाली.


---

स्वर्गाच्या दारावर शब्द कोरलेले आहेत - जो दैवापुढे मान तुकवतो तो करंटा. - हफीझ

अमेरिका व आफ्रिका खंडामध्ये त्यांच्या वसाहती स्थापन झाल्या. पण या सगळ्या देशांमध्ये त्यांना विकसित संस्कृती कुठेही आढळली नाही. भारताची परिस्थिती वेगळी होती. मुघली आक्रमणांमुळे भारतीय व्यवस्था विस्कळीत झाली असली तरीही संस्कृतसारखी भाषा, स्थापत्य आणि तत्कालीन समाजव्यवस्था या त्यांच्या अपेक्षांपेक्षा कितीतरी विकसित होत्या. यातूनच या व्यवस्थांचा अभ्यास करण्याची त्यांची इच्छा निर्माण झाली. पश्चिमात्य संस्कृतीपेक्षा प्राचीन आणि विकसित अशा भारतीय संस्कृतीचे वास्तव त्यांना, विशेषतः धर्म प्रसारकांना मान्य करणे कठीण होऊन बसले. भारतीय समाज व्यवस्थेची वीण एवढी प्रभावी होती की, त्यांचे पाश्चिमात्यीकरण होत असले तरी धर्मांतर होत नव्हते. यातच सुधारणेच्या नावाखाली या व्यवस्थांना सुरुंग लावायला सुरवात झाली.

कालक्रमणामध्ये प्रत्येक व्यवस्थेवर जळमटे बसतात. त्यामध्ये सुधारणाही आवश्यक असतात, पण सुधारणा म्हणजे 'मोडतोड' नाही. व्यवस्थेचा मूळ आशय समजून त्यात बदल किंवा सुधारणा करायच्या असतात. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात आलेल्या मार्क्सच्या सिद्धांतानी भारतीय व्यवस्थांच्या या मोडतोडीत मोठा हातभार लावला. मार्क्सवाद आज जवळजवळ मोडीत निघाला असला तरी त्यानी भारतीय व्यवस्थांचे केलेले नुकसान भरून काढणे कठीण काम आहे.

वॉरन हेस्टिंग हा भारताचा पहिला गव्हर्नर जनरल. महसुलाप्रमाणेच इतरही व्यवस्थापन आणि न्यायादानाची जबाबदारीही त्यांच्यावर येऊ लागली. वॉरन हेस्टिंग हा दूरदृष्टी व धोरणी मनुष्य होता. १७५० मध्ये एक लिपिक म्हणून ईस्ट इंडिया कंपनीत तो रुजू झाला होता. पुढच्या ३० वर्षामध्ये इंग्रज-भारतीयांमध्ये झालेल्या अनेक युद्धांमध्ये त्याचा सहभाग होता. भारतीय समाज व संस्कृतीची त्याला चांगली ओळख झाली होती. यांच्यावर राज्य करायचे तर ते त्यांच्याच सांस्कृतिक व्यवस्थेनुसार करायला हवे हे त्याने ओळखले होते. यातूनच त्यांनी पंडितांना एक नवीन 'स्मृती' तयार करण्याची विनंती केली आणि तशी ती त्याने करवून घेतली.



LETTER

FROM

WARREN HASTINGS, Esq.

Governor-General of *Fort-William*, in *Bengal*,

TO THE

COURT OF DIRECTORS

OF THE

United Company of Merchants of *England*, Trading to the


EAST-INDIES.

HONOURABLE SIRS,

I HAVE now the Satisfaction to tranfmit to you a complete and corrected Copy of a TRANSLATION of the GENTOO CODE, executed with great Ability, Diligence and Fidelity, by Mr. *Halhed*, from a Perfian Verfion of the original Shanfcrit, which was undertaken under the immediate Infpection of the Pundits or Compilers of this Work.

I HAVE

**वॉरेन हेस्टिंग्ज यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांना लिहिलेले पत्र**



A

CODE

OF

GENTOO LAWS,

OR,

ORDINATIONS

OF THE

*PUNDITS*,

FROM A

PERSIAN TRANSLATION,

MADE FROM THE

ORIGINAL,

WRITTEN IN THE

SHANSCRIT LANGUAGE.

*LONDON:*

PRINTED in the YEAR M DCC LXXVI.

**विवादार्णवसेतूचे १७७६ साली प्रकाशित झालेले इंग्रजी भाषांतर**

'विवादार्णवसेतू' हे त्या नव-स्मृतीचे नाव. आधिच्या अनेक स्मृतींमधले दाखले घेऊन तयार केलेले हे अपत्य असल्यामुळे त्याला अपेक्षित अधिकार प्राप्त होऊ शकला नाही. त्याचे पहिले भाषांतर पर्शियनमध्ये झाले.

पर्शियनमधून त्याचे भाषांतर, नर्थॅनियल हॉलहेड (Nathaniel Halhed) यांनी "A" Code of Gentoo Laws" या शीर्षकाखाली इंग्रजीत केले. हॉलहेड यांनी याला एक प्रदीर्घ प्रस्तावनाही लिहिली आणि १७७६ साली ते प्रकाशित झाले. यामध्ये इंग्रजांची 'नवीन' व्यवस्था निर्माण करण्याकरता केलेले प्रयत्न, धडपड व काळजी लक्षात येते.

व्यवस्थाबदल ही कधीही सोपी प्रक्रिया नसते. या बाबतीत इंग्रजांनी बाळगलेला संयम आणि मुत्सद्दीपणा याला जगात तोड नाही.

आपल्याला स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्षे झाली. आपणही एक नवीन व्यवस्था म्हणजे 'घटना' लिहिली. दुर्दैवाने त्याची पाळेमुळे ही भारतीय संस्कृतीमध्ये नव्हती. ती जगातली सर्वात मोठी घटना आहे. जगातल्या तत्कालीन अशा अनेक घटनांमधील व्यवस्था एकत्र करून बांधलेली ती एक गोधडीच आहे. आजही ती भारतीय संस्कृतिक व्यवस्थेशी एकरूप होऊ शकलेली नाही. ७० वर्षांत १०० वेळा त्यामध्ये बदल करायला लागले.

वॉरन हेस्टिंग्जनी लिहून घेतलेली 'विवादार्णवसेतू' काय किंवा आपली सध्याची घटना काय, या उसनेगिरी करून लिहिलेल्या व्यवस्था असल्यामुळे केव्हाच प्रभावी होऊ शकत नाहीत. अस्सल आणि नक्कल यातला हा फरक आहे.

या बाबतीत ब्रिटिशांकडून आपण काहीच शिकलो नाही. भारतावरती ते १५० वर्षे राज्य का करू शकले याचे उत्तर, ब्रिटिशांनी भारतीय व्यवस्थेच्या केलेल्या अभ्यासामध्ये आहे. ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा हेतू हा या व्यवस्थेला सुरुंग लावण्याचा होता. फार मोठ्या प्रमाणावर ते यामध्ये यशस्वीही झाले.

नियोजित वेळेच्या आधी पुरा झालेल्या पत्रीपुलाच्या (कामाच्या) यशाचे गमक हे सर्व घटकांमध्ये आलेल्या सुसुत्र 'व्यवस्थेला' आहे. प्रत्येक घटक जेव्हा आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडतो तेव्हाच कुठलीही व्यवस्था यशस्वी होऊ शकते; मग ती राजकीय असो, सामाजिक असो, वा शैक्षणिक असो.

दुर्दैवाने भारत हा फार मोठ्या 'अव्यवस्थेकडे' मार्गक्रमण करताना दिसतोय. याचे मुख्य कारण म्हणजे तो आज कुठलीच 'व्यवस्था' प्रामाणिकपणे पाळायला तयार नाही. कायदे, नियम हे पाळण्यापेक्षा ते मोडण्यामध्ये तो अधिक धन्यता मानतो. विद्यादेवतेचे (गणपतीचे) उत्सव रस्त्यावर वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा करत साजरा करणे, किंवा इतर अशा उत्सवांना राजकीय हेतूने 'आवाजी' करणे, आणि त्याला संस्कृती रक्षण म्हणणे, या सारखा दुसरा मोठा विनोद नाही. उत्सवांचे राजकारण्यांनी केलेले बकालीकरण ही खरं म्हणजे फार मोठी सांस्कृतिक शोकांतिका आहे.

लग्न असो, कुटुंब किंवा वाहतूक असो, या सगळ्या व्यवस्थांना एक लक्ष्मणरेषा असते. तिचा आदर केला तरच या व्यवस्था यशस्वी होऊ शकतात. तात्पुरत्या वैयक्तिक स्वार्थाकरता तिचा अनादर हे गोंधळाला निमंत्रण असते. आजचे भारतीय राजकारण, आणि राजकारणी हे व्यक्तीगत किंवा समूह स्वार्थाकरता 'व्यवस्थां'ना सुरुंग लावण्यात मग्न आहेत. अशा अव्यवस्थेमधून फक्त अराजकच निर्माण होऊ शकते.

म्हणूनच या अराजकतेपासून देशाला वाचवायचे असेल तर अग्रक्रमाने परंपरागत (सु)व्यवस्थांचे सामर्थ्य लक्षात घेऊन त्यांचा आदर करणे अपरिहार्य आहे. आधुनिक शिक्षणामध्येच परंपरागत समाज व्यवस्थां मागील मूल्यांची तोंडओळखही हे काम करू शकेल. भाषेला समृद्ध करणारी पाणिनिची 'व्याकरण' व्यवस्था, आणि गणिताचा आत्मा असलेली 'शून्य' आणि 'अंक' ही व्यवस्था भारताची देण आहे हे यावेळी विसरून कसं चालेल?

**– डॉ. विजय बेडेकर**

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❈ संपर्क ❈

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.